


# श्री साईलीला

सेंबर

. ५० पै

१९

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ — टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

भाव तसा देव. मंत्र, तीर्थ, ब्राह्मण, देव, ज्योतिषी, वैद्य व गुरु यांच्यावर तुम्हीं जशी श्रद्धा ठेवाल तसें तुम्हांला फळ मिळेल, ज्या प्रमाणांत श्रद्धा त्याप्रमाणांत फळ. केवळ वरकरणीं भाव असला तर तुम्हांला कांहींएक फळ मिळणार नाहीं आपण कोणाचें वाईट चिंतूं नये. चांगलें चिंतावें, चांगलें व जें कल्याणाचें असेल तें सांगावें. ज्याच्या दैवांत जसे असेल तसे घडेल. तुम्हीं कोणाचेंही दैव बदलू शकत नाहीं. योग्य सल्ला देणें तुमचें कर्तव्य. ऐकणें न ऐकणें दुसऱ्याचें काम. त्याची चिंता तुम्हीं बाळगण्याचें कारण नाहीं.

—श्रीसाईसच्चरित

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] डिसेंबर १९६५ [ अंक ९ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६२३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०,

बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

सध्यां आपल्या देशाला युद्धजन्य परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे व आपण प्राप्त परिस्थितीला अनन्यसाधारण धैर्यानें व निर्धारानें तोंड देत आहोत. त्याचबरोबर दुसरें एक संकट आपल्यापुढें उभें राहिले आहे. संकट येतें तेव्हां तें एकटेंच येत नाहीं. आपल्याबरोबर दुसरी अनेक संकटें घेऊन तें येत असतें. देव जणूं काय आपली कसोटी पहात आहे. त्या कसोटीला आपण उतरायचें आहे. अन्न संकटावर मात करण्यासाठीं आपले लोकप्रिय पंतप्रधान माननीय लालबहादुर शास्त्री यानीं राष्ट्रांतील जनतेपुढें एक सूचना ठेवली आहे. ती मोठी बिकट व अव्यवहार्य किंवा आचरणांत न आणतां येणारी नाहीं.

कोणती ती सूचना ? दर सोमवारीं रात्रौ आपण उपोषण करायचें. किती नामी व व्यवहारीकच नव्हे तर अध्यात्मिक दृष्ट्याही ती फार महत्त्वाची आहे. सध्यां दुष्काळी परिस्थितीमुळें ठिकठिकाणीं अन्नधान्याचा तुटवडा तीव्रतेनें भासूं लागला आहे. या देशांत चाळीस कोटीं लोक आहेत. त्या सर्वांनीं पंतप्रधानांचा आदेश अंमलांत आणण्याचा निर्धार केला तर अन्न बचतीच्या दृष्टीनें केवढें तरी मोठें कार्य होणार आहे. दसका लकडी, एकका बोजा, या न्यायानें अन्नसंकट निवारणावर तो एक रामबाण इलाज ठरणार आहे.

आम्हां हिंदवासीयाना तरी उपोषण करणें प्राचीन काळापासून अगदीं अंगवळणी पडलेलें आहे. आमच्या धर्मांत उपोषणाचें फार मोठें महात्म्य सांगितलें आहे. आमच्याच नव्हे तर सर्वांच्या धर्मांत उपोषणाला महत्त्वाचें स्थान आहे. उपोषण हें चित्त शुद्धीला व मनस्वास्थ्याला फार पोषक आहे. आमच्या भगिनी वर्गांच्या तर उपास तापास अंगवळणीं पडलेले आहेत. एकादशी, शिवरात्र वगैरे पवित्र दिवशीं आपण देवाला आळविण्यासाठीं निराहार किंवा फळाहार करीत नाहीं का ?

उपोषणामुळें आपली शक्ति कमी होत नाहीं तर उलट वाढते. उत्साह वाढतो व काम करायला नवी उमेद येते.

रोज दोन वेळां किंवा अधीक वेळां खा, खा खायचें आणि आजाराला आमंत्रण करायचें. आपण थकतों भागतों आणि मग आपणास विश्रांतीची जरूरी भासते. आपण ती घेतोही. न घेऊन चालत नाही. त्याचप्रमाणें आपण सतत जी खाण्याची क्रिया चालू ठेवतों त्यामुळें शरीरांतील पचनेंद्रियावर सतत ताण पडत असतो. त्या नाजुक यंत्रांना नको कां विश्रांति ? ती नाहीं दिली तर तुम्हांला आजारी पाडून मग ती इंद्रियें जबरदस्तीनें विश्रांती घेतात.

त्यासाठीं उपवासाला धार्मिक समजुतींची जोड करून देण्यांत आली आहे. आपली धर्मावर श्रद्धा असते, धर्मकारण साधावें व चित्तशुद्धी व्हावी यासाठीं उपवास सांगितले आहेत. करणारे करतात व त्याची गोड फळें त्यांना चाखायला मिळतात.

शरीर पोषणासाठीं जशी अन्नाची व खाण्यापिण्याची जरूरी आहे तशीच त्यावर उपवासाच्या रूपानें बंधन घालण्याचीही जरूरी आहे. आपणाला अन्न पाणी झोप व खेळती हवा पाहिजे त्याचप्रमाणें शरीर स्वास्थ्याला व हें जीवन सुखासमाधानानें कंठण्यासाठीं मधून मधून आपण उपवासाचीही कांस अवश्य धरली पाहिजे.

आमच्या धर्मानें व इतर धर्मांनींही उपवासाची सांगड देवधर्माशीं घालून देऊन अनेक गोष्टी साध्य केल्या आहेत. त्यामुळें शरिरांतील इंद्रियांना विश्रांति मिळते उत्साह वाढून आपल्याकडून दुप्पट कामकाज होऊं शकतें व अन्नाचीही त्यामुळें बचत होते. याशिवाय उपवासामुळें अगणित गोष्टी सहजासहजी साध्य होतात, त्या वेगळ्याच.

एखाद्या रोगानें पकडींत धरलें म्हणजे उपवास करावयाचा! आग लागली म्हणजे विहीर खणायला जायचें! त्यांतलाच हा प्रकार आहे नाहीं का? त्यापेक्षां आधींच काळजी घेऊन आठवड्यांतून एखाद्या ठरावीक दिवशीं उपोषण करण्याचा निर्धार करून तो अंमलांत आणण्याचें व्रत स्वीकारलें तर तें अधीक हितावह नाहीं का होणार?

उपवास हा खच्ची करणारा नसून तो शारिरीक व मानसीक वाढ करणारा आहे हें आम्हांला कोणी शिकवायला का पाहिजे? हें तत्त्वज्ञान आमच्या रक्तांत भिनलेलें आहे. कारण तें सर्व दृष्टींनी उपकारच होऊन राहणारें आहे. आपणांस बरोबर उपवासाचे पावित्र्य जाणून तो आचरणांत आणणारे स्त्रीपुरुष आढळून येतील.

तेव्हां उपवास ही आपत्ति नाहीं. तर भगवत् भक्ति आहे. त्यामुळें आत्माराम आमच्यावर प्रसन्न होऊन आम्हांला सुखसमृद्धि देतो. दीर्घायुष्याकडे नेणारा तो एक मार्ग आहे.

आज अन्न टंचाईमुळें उपवास ही एक राष्ट्रीय गरज होऊन राहिली आहे. अन्न टंचाईवर मात करण्यासाठीं आपल्या पंत प्रधानानीं सोमवारी एक वेळ उपोषण करण्याची अखिल राष्ट्राला हांक मारिली आहे. ती झेलणें हें आपलें एक राष्ट्रीय कर्तव्य आहे. एवढेंच नव्हे तर तें आमच्या उन्नतीचें एक प्रभावी साधन आहे. ही हांक आपण मोठ्या उत्साहानें झेलूं या व आपल्या सान्निध्यांत जे जे येतील त्यानाहि त्या हांकेचें पावित्र्य व मर्म समजून देऊं या.

—संपादक

# मन सोवळें तर सारें सोवळें

सोवळें ह्या शब्दाचा खरा अर्थ लक्षांत आणिला असतां तें सर्वांना सारखेंच अवश्य आहे हें आपणाला मान्य होईल. सोंवळें म्हणजे स्वच्छ, सोज्वळ किंवा पवित्र, ज्यामध्यें प्रकाश किंवा स्वच्छता आहे, जें तेजयुक्त आहे तें. ह्याच्या उलट जें घाणेरडें आहे, ज्याचा मळ गेलेला नाहीं तें ओंवळें. अर्थात जें चांगले आहे, तें अवश्य आहे हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं. असें करणें म्हणजे चुना पांढरा असतो, कावळा काळा असतो, सूर्य प्रकाशमय आहे, अशा अबाधितपणें सत्य असणाऱ्या गोष्टींची व्यर्थ उक्ति करण्याप्रमाणें होय. तरीपण कोणी चुन्याचा रंग पांढरा नाहीं किंवा ज्याचा रंग काळा तो चुना असें म्हणूं लागला म्हणजे जाग्रतिदाखल त्याच्या खऱ्या स्वरुपाचें वर्णन करणें भाग होतें. आमच्या सोंवळ्यासंबंधाच्या प्रचलित कल्पना कांहीं अंशीं अशाच तऱ्हेच्या झाल्या असल्यामुळें व जें धडधडीत ओंवळें त्याला उच्चतम सोंवळें मानण्याचा प्रघात पडला असल्यामुळें खरें सोंवळें कोणतें व त्याची किती आवश्यकता आहे ह्याविषयीं विवेचन करणें भाग आहे.

सोंवळें ह्या शब्दाचा अर्थ वर दिलाच आहे. हा शब्द व त्यानें सूचित होणारा अर्थ सर्वांना सारख्याच प्रमाणानें समजेल असें नाहीं. कित्येक युरोपिअनांना जातिभेद या शब्दाचा अर्थ समजत नाहीं. अस्पृश्यता म्हणजे काय हें कळत नाहीं. त्याचप्रमाणें सोंवळें ज्यांच्यामध्यें चालू आहे, तेवढ्यांनाच त्याचा अर्थ समजेल. इतरांना कळणे कठीण. सोंवळें हा शब्द उच्चारतांच आपल्या मनांत खाण्यापिण्याच्या पदार्थसंबंधाची व वस्त्रप्रावरणाची कल्पना येते. हा शब्द खरकटें व निर्लेप ह्या दोन शब्दांशीं संलग्न आहे. एखादा खाण्याचा पदार्थ खरकटा कसा होतो व निर्लेप कसा होऊं शकतो, हें महाज्ञान्यांनासुद्धां उकलण्याला कठीण कोडें आहे. तांदुळाचें पीठ पाण्यांत भिजवून त्याची भाकरी भाजली तर ती सोंवळ्याचें वस्त्र नेसल्याशिवाय खातां कामा नये. तेंच पीठ दुधांत भिजवून त्याची दशमी भाजली कीं ती निर्लेप झाली. ती ओंवळ्यानें खाण्याला हरकत नाहीं. हरभ-ऱ्याच्या डाळीची चटणी निर्लेप व पिठलें खरकटें! लोणच्याचें सोंवळ्याला डिग्री लावतां येत नाहीं. पण त्यामध्यें इराणांतून किंवा बलुची देशांतून आलेला चामड्याच्या आच्छादनानें युक्त प्रवासी हिंग घातलेला असतो! ब्राह्मण (मुंबई इलाख्यांतले तरी) मांस व मासे खात नाहींत. ते ह्या वस्तु अपवित्र म्हणजे ओंवळ्या समजतात. परंतु अपवित्र मानल्या जाणाऱ्या आणि तशा असणाऱ्या वस्तु, त्या खाणाऱ्यांच्या दृष्टीनें सोंवळ्या असतात व त्या इतर भाज्यांप्रमाणें धुवून चिरून झाल्यावर जर त्यांना काप-

त्याच्या सुताचा स्पर्श झाला तर त्या ओंवळ्या होतात ! बंगाल्यामध्यें रस्त्यानें जातां जातां एखादा महामहोपाध्याय चटकन् मोठासा मासा विकत घेतो, व तो लोंबकळवीत ट्रॅममध्यें उघडपणें बसतो व घरीं नेऊन यथेच्छ ताव देतो; तरीपण त्याचें सोंवळें नाहींसें होत नाहीं. पिण्याचे पदार्थांच्या सोंवळेपणाविषयीं अशाच भ्रामक कल्पना आहेत. त्यांचें वर्णन करूं लागलें असतां एक लहानसा ग्रंथ होईल.

वस्त्रांच्या सोंवळेपणाच्या बाबतींत एक ढोबळ नियम दिसतो तो हा कीं, ज्या मानानें वस्त्राची किंमत अधिक त्या मानानें त्याचें सोंवळें अभेद्य ! उदाहरणार्थ, कापसाचें स्वच्छ धोतर सर्वांत सोंवळें गणलें गेलें पाहिजे व कांहीं ठिकाणीं धूत वस्त्रांचें सोंवळें सर्वांत श्रेष्ठ समजलें गेलें आहे. परंतु तें एकवेळ नेसलें कीं ओंवळें होतें. धोतराची किंमत फार नसते निदान पूर्वी तरी नसे. धोतरापेक्षां लोंकरीची धावळी महाग म्हणून तिचें सोंवळें कधींहि भंगत नाहीं. लोंकरीपेक्षां रेशमाचें कापड महाग, तेव्हां पीतांबराच्या सोंवळ्याला कस लावणेंही अशक्य झालें आहे. वास्तविक पाहिलें असतां ही दोनहीं सोंवळीं कमी दर्जाचीं. कारण धावळी ही मेंढ्याच्या लोंकरीची केलेली व रेशीम किड्यांपासून उत्पन्न झालेलें. धूत वस्त्र व ओवळें वस्त्र ह्यांच्यामध्यें मध्यस्थी करण्याचें काम बहुधा धावळीलाच करावें लागतें. इतकें तिचें महत्व मानलें गेलें आहे. धावळीचें स्वरूप कसें कां विद्रुप असेना, तिला पाण्याचा स्पर्श किती महिन्यांत झालेला कां नसेना, तिला घामाचीं पुटें बसलेलीं असलीं तरी हरकत नाहीं, पण तिचें सोंवळें कायम तें कायम ! अर्थात् आचाऱ्या पाणक्यांची ती कायमची आश्रित होऊन बसली तर त्यांत आश्चर्य कोणतें ? सोंवळ्याची आणखी एक प्रचंड खाण म्हणजे ब्राह्मणाचें जानवें. "यज्ञोपवितं परमं पवित्रं" कोण त्याचें पावित्र्य नष्ट करूं शकेल ? धावळी सोंवळ्यापुरतीच नेसावी लागते; पवित्र यज्ञोपवीत एकसारखें अंगावर असतें. चर्मावर सांचणाऱ्या मलाचें ग्रहण केल्यामुळें व घामाला आसरा देत गेल्यामुळें त्याला कृष्णवर्ण प्राप्त झालेला असतो. अर्ध्या आण्याचा साबण संपविला तर त्याला कदाचित् किंचित् पांढरेपणाची झांक मारील. तरी पण हें यज्ञोपवित परम पवित्र तें पवित्रच !

पादत्राणांसंबंधी विचार करतां वस्त्रांना लागू असलेला नियम त्यांनाही लागू असावा असें दिसतें. बैलांची कसाईखान्यांत होणारी दररोजची हानी फार मोठी असल्यामुळें त्यांच्या चामड्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होतो. अर्थात् बैलांच्या चामड्याच्या वहाणा स्वस्त असल्यामुळें त्यांचें सोंवळें हीन दर्जाचें. हरिणाचें चामडें महाग म्हणून त्याच्या सोंवळ्याची डिग्री वरची. वाघाचें फारच महाग, तेव्हां तें पितांबराप्रमाणें संपूर्ण सोवळें. ह्याप्रमाणें चामड्याच्या सोंवळेपणाची कथा आहे. सिंहाचें चामडें सहसा मिळत नाहीं म्हणून; नाहीं तर त्याचें पावित्र्य बिनमोलाचें झालें

असतें. ह्या सोंवळेपणाच्या कल्पना येथवरच थांबल्या असत्या तर कांहीं विवक्षित जातींनाच त्या बाधक झाल्या असत्या. पण अखिल मानवजात ह्या भोंवऱ्यामध्यें सांपडली असल्यामुळें आमच्या राष्ट्राचें केवढें नुकसान होतें आहे ह्याची कल्पना आली म्हणजे अंगावर शहारे उभे राहतात व ह्या भ्रामक कल्पनांची घातकता नजरेस येते. "जरी ब्राह्मण भ्रष्ट तरी तीहीं लोकीं श्रेष्ठ." वस्त्रांमध्यें जसा पीतांबर सोंवळा तसा मनुष्यांमध्यें ब्राह्मण ! त्यानें कितीहि कुकर्में केलीं तरी तो आपल्या यज्ञोपवीताप्रमाणें पवित्रच. ह्याप्रमाणें डिग्री डिग्रीनें इतर जातींचें पावित्र्य कमी ! ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आमच्या जातिभेदांच्या कल्पनांची तीव्रता कमी होण्याऐवजीं वाढत आहे. एकानें दुसऱ्याच्या हातचें खाऊं नये, ( चोरून खाण्यास हरकत नाहीं ) पिऊं नये, असें होऊन दुजाभाव वाढत आहे. कृत्रिम उच्चनीचतेची रेलचेल झाली आहे. सोंवळयांच्या रूढीनें चालत आलेल्या कल्पना जर नाहींशा होतील व स्वच्छता म्हणजे सोंवळें ही कल्पना रूढ होईल तर देशाचें कोटकल्याण होईल.

सोंवळयाच्या प्रचलित कल्पनांमुळें ज्यांच्यामध्यें सोंवळयांचें बंड फार आहे, अशा ब्राम्हणांचें किती नुकसान होत आहे, ह्याची जागृति त्यांच्या ठिकाणीं नसावी ही मोठी आश्चर्याची व खेदाची गोष्ट आहे. ह्या सोंवळयाच्या पायीं ह्या जातीची वाढ खुंटली आहे असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. शरीराच्या वाढीला चांगल्या व स्वच्छ कपड्याची जरूरी असतें. विशेषतः हल्लींच्या सारख्या थंडीच्या दिवशीं तर कपड्यांशिवाय चालावयाचें नाहीं. ब्राम्हणवस्तींच्या मुंबईतील चाळींमधून फिरून पाहिलें असतां आपल्याला असें दिसून येईल कीं सदरहू चाळींतील बहुतेक लहान मुलें कपड्यांशिवाय असतात. मुंज झालेली मुलें फक्त लंगोटी नेसून असतात. कपडे घातले कीं स्वयंपाकाचें सोंवळे बिघडतें. ह्याचा परिणाम असा होतो कीं, थंडीवाऱ्यापासून मुलांनें व्हावें तसें रक्षण होत नाहीं. त्यांना नेहमीं सर्दी होते. त्यांच्या नाकांतला शेंबूड कधीं नाहींसाच होत नाहीं. त्यांची वाढ खुंटते. हीच स्थिति प्रौढ बायांची व मुलांच्या आयांची असते. त्यांनाहि सोंवळयानें स्वयंपाक करावयाचा असल्यामुळें सकाळपासून उष्टें खरकटें आटपेपर्यंत अल्पवस्त्रीं रहावें लागते. त्यांना होणाऱ्या सर्दीला व कफाला कधीं आळाच पडत नाहीं. आजाराच्या वेळीं सोंवळयांच्या पायीं स्त्रियांची फार शोचनीय स्थिति होतें. कित्येक वेळां सोवळे हें स्त्रियांच्या मृत्यूला कारणीभूत होतें. गेल्या इंफ्लुएंझा तापाच्या साथींत कित्येक आजारी स्त्रिया सोंवळयाला बळी पडलेल्या माझ्या पहाण्यात आहेत. सोंवळयांची खरी कल्पना प्रसृत

होऊन रूढ शास्त्याशिवाय हे कित्येक वेळां एकाएकीं होणारें व अनेक वेळां हळूंहळूं चालू असणारे लहान अर्भकांचें व स्त्रियांचें खून थांबतील असें वाटत नाहीं. शिवल्याबरोबर ओंवळें होणारें सोंवळें नाहींसें झालें पाहिजे व त्याच्या ठिकाणीं उज्ज्वलतेच्या सोंवळयाची प्रस्थापना झाली पाहिजे.

जुन्या तऱ्हेचें सोंवळें पाळणाऱ्यांच्या घरीं ओंवळें म्हणून जर कांहीं असेल तर घरांत असणारा स्वयंपाकी व उष्टयांना लावावयाचें शेण. आचाऱ्याची अस्वच्छता कमालीची असते, हें सर्वांना माहित आहेच. अंग नेहमीं घामानें थबथबलेलें असावयाचें व कधीं पाण्याची भेट न झालेली धर्मपी धाबळी नेसावयाला असावयाची. अंगावर शिबें, नायटे किंवा गजकर्ण ह्या उद्भिजांची वाढ झालेली नाहीं, असा आचारी निरळा. ह्या प्रकारच्या मनुष्यानें केलेला स्वयंपाक ज्याला गोड लागत असेल, तो मनुष्य धन्य होय. आचाऱ्याच्या हातचें जेवण म्हणजे आपद्धर्म समजावा. त्याचप्रमाणें शेणाला सोंवळयाच्या बाबतींत मिळालेलें अग्रस्थान अगदीं अयोग्य आहे. शेणाच्या ठिकाणीं स्वच्छता करण्याचें सामर्थ्य आहे हें कबूल आहे, परंतु मुंबईमधील दाणा खाणाऱ्या गुरांच्या शेणांत ते कितपत आहे, ह्याविषयीं वानवाच आहे. जेवणाची हल्लींचीच पद्धति कायम ठेवली तरीसुद्धां शेणाचा स्वच्छतेच्या कामीं उपयोग करणें जरूरीचें आहे, असें वाटत नाहीं.

सोंवळे खाण्यापिण्याच्या पदार्थांसंबंधीं किंवा वस्त्रप्रावरणापुरतेंच असतें असें नाहीं, शारीरिक स्वच्छता हाहि एक सोंवळयाचाच भाग आहे. दररोज शरीर साफ धुणें, म्हणजे योग्य प्रकारें स्नान करणें—काक स्नान नव्हे—हा एक सोंवळयाचा महत्वाचा भाग आहे. शरीरावर वास करणारे चामडीचे रोग, डोक्यांतला खवडा, केसांत वास करणाऱ्या उवा व लिखा, ह्या सर्वांनीं बाटतें म्हणजे ओंवळे होतें, हल्लींच्या रूढ चालीप्रमाणें सोंवळें केलें असतां हे रोग नाहींसे होण्याऐवजीं वाढण्याचाच संभव अधिक आहे. म्हणून साबण व पाणी ह्यांचा योग्य प्रमाणानें उपयोग करून शरीराचें सोंवळें राखावें.

ह्या बाह्य सोंवळ्याहून भिन्न असें एक सोंवळें आहे, तें साबण व पाणी ह्यांनीं राखतां येण्यासारखें नाहीं, तरीपण महत्वाच्या दृष्टीनें ह्या बाह्य सोंवळयांपेक्षां श्रेष्ठ दर्जाचें आहे. तें सोंवळे मनाचें होय, वाईट विचारांनीं, कुकल्पनांनीं मन बाटतें म्हणजे त्याला ओंवळेंपणा प्राप्त होतो. 'शरीर धड तर मन धड' हें जसें खरें आहे तसेंच मन धड तर शरीर धड हेंहि खरें आहे. आपल्या मनांत वास करणाऱ्या विचारांचा पगडा शरीरावर बसतो हें कोणी अनुभविलें नाहीं. कुढ्या स्वभावाच्या मनुष्यांचें शरीर रोगमय बनतें हें आपण नेहमीं पहातों व म्हणूनच डॉक्टर आजारी

मनुष्याला आनंदी रहाण्याचा सल्ला देतात. मनाचा जोर दुसऱ्या कऱ्याच शक्तीपेक्षां मोठा असतो. ह्यासाठीं मन जर सोवळें असेल, त्याच्या ठिकाणीं पापवासना नसून पुण्येच्छाच जर वास करतील तर आपण खरें खरें सोवळें पाळलें असें होईल.

साधुसंतांना अशाच प्रकारच्या सोवळयांची महती वाटते; म्हणूनच तुकारामानें म्हटले आहे कीं सदा सर्वदा सोवळा, ज्याला मळ स्पर्श करूं शकत नाहीं असा जो देव, हा ज्यांचा आवडता आहे. अशा देवाविषयीं ज्यांच्या अंतःकरणांत प्रेमभाव आहे, तींच ह्या जगामध्यें ' पवित्र सोवळी ' गणावीं. आमचा रूढीचा पवित्रपणा नाहींसा होवो, स्वच्छतेचें व पावित्र्याचें आमचें सोवळें वाढो व परमेश्वराविषयींचा आमचा प्रेमभाव वृद्धिंगत होवो ह्या प्रकारच्या सोवळयांची आम्हां सर्वांना आवश्यकता नाहीं काय !

# विसावा

जीवनसाथी तूंच मोहना।
विसावा तूंच यदुनंदना ॥ध्रु॥
जीव भोगतो दुःखे नाना।
ज्याची त्याला असे कल्पना ॥ १ ॥
तव नामानें तरले पापी।
कृपा तुझी विश्वाला व्यापी ॥ २ ॥
एकच आतां उरे वंचना।
तुजसाठीं घ्यावा जन्म पुन्हा ॥ ३ ॥
आठवता तुज मनि चिरंतन।
सुसह्य होते मायाबंधन ॥ ४ ॥
प्राणीजात हे अवघे येथील।
रम्य खेळणी तुझ्या करांतिल ॥ ५ ॥
जीवनसाथी तूंच मोहना।
विसावा तूंच यदुनंदना ॥ ६ ॥

—बा. भा. मगदूम.

# एकनाथी भागवत धर्म

लेखक : द. शं. टिपणीस

## प्रास्ताविक

भागवत धर्म हा हिंदुधर्मांतर्गत असा एक मोठा पंथ आहे. बहुसंख्य महाराष्ट्र हा भागवत पंथीय वा धर्मीय आहे. पंढरीचा विठोबा हें महाराष्ट्रांतील बहुसंख्य लोकांचें दैवत आहे. ज्याला आपण वारकरी म्हणतो, कार्तिकी आषाढी एकादशांना चंद्रभागेवर जो असंख्य भक्तांचा मेळावा जमतो. तो भागवत पंथीय आहे. परंतु वारकरीपंथ म्हणजे भागवत धर्म असें मात्र नव्हे. वारकरी हा माळकरी असला, रामकृष्ण हरी, ज्ञानदेव तुकाराम असा गजर करीत असला व एकादशांना पंढरीची नियमीत वारी करीत असला तरी तेवढ्यावरून तो संपूर्ण भागवत धर्मीय आहे असें म्हणतां येणार नाहीं. नामस्मरण, भजन, विठोबाची पूजा अर्चा, माळा मुद्रा ही सर्व भागवत धर्माची बाह्यांगे आहेत त्यांच्या आधारें भागवत धर्माच्या अंतरंगांत शिरून जें एक उच्चत्तम तत्त्व हस्तगत करून माणसाला मानव करून मोक्षाप्रत नेण्याचा भागवत धर्मानें जो मार्ग आखला आहे त्याप्रमाणें वागेल तो सच्चा भागवत धर्मीय आहे असें म्हणतां येईल.

### पंढरीचा विठोबा हें प्रतीक

भागवत धर्माचा मुळपाया असें जें एक उच्चतम तत्त्व की ज्यापेक्षां पूर्ण तत्त्व वा अक्षर सिद्धांत असा दुसरा नाहीं. त्याचें प्रतिक पंढरीचा विठोबा आहे या काळ्या-जगाच्या मायेच्या आंत जे एक शुद्ध पवित्र धवलतेज आहे त्याचे प्रतिक म्हणजे विठोबा आहे. म्हणून विठोबा काळा असला तरी आंतून पवित्र व लक्षावधी तेजस्वी दिव्याहूनही तेजस्वी असा आहे. हें जें तेज तें सर्व प्राणीमात्रांच्या हृदयांतून वावरत असल्यामुळें आपणाला विठोबा म्हणजे एक जवळचा जिवलग दोस्त वाटतो म्हणून भक्त विठोबाला आपलेपणानें विठ्या, विठू, काळ्या अशा प्रेमळ शब्दानें संबोधीत असतात. बाबा पळकुट्या पाटील म्हणत. जगाचा पाटीलच तो. हृद-याच्या पंढरींत जागता खडा पहारा करून जगाच्या धारणेसाठीं मार्गदर्शन करीत असतो, पळकुट्या तर खराच. डोळ्यांत तेल घालून जपलें तर ठीक नाहींतर विका-राच्या गर्दीचा फायदा घेऊन तो केव्हां लुप्त होईल याचा नेम नाहीं. अशा प्रकारची जगव्यापी जी एकशक्ति, जें एक शुद्ध प्रेम, जो एक आनंद तो फुलवून त्याचा प्रसार अखिल मानवी हृदयांतून करावा. यासाठीं भागवत धर्माचा अवतार झाला आहे.

या भागवत धर्मांचा मूळ उगम आहे तरी कोठें, आपलें उद्देश साध्य करण्यासाठीं त्यानें कोणतें आचार विचार सांगितले आहेत, जगाच्या परिस्थितीचें तक्र घुसळून त्यांतील विश्वशांतीचें मानवी प्रेमाचे, मानवतेचे नवनीत काढण्यासाठीं जागतिक संघर्षांची चक्रे आज गरागरा फिरत आहेत तें नवनीत, तो विश्वधर्म, ती मानवता वा तें शुद्ध प्रेम हस्तगत करण्यासाठीं भागवत धर्मानें संघर्षाचा नव्हे तर शांतिचा कोणता मार्ग आखला आहे, आजच्या काळीं भागवत धर्मांची किती व कशी जरुरी आहे, वगैरे गोष्टींचा जीवनाला उपयुक्त होईल अशा प्रकारें विचार करणे हा या लेखांचा हेतु आहे.

**भागवत धर्माची जननी**

भागवत धर्मांचा मूळ शोध लागला तर आपणास उपनिषधांपर्यंत मार्गे जावें लागेल. उपनिषधें भागवतधर्मांची जननी आहे. वेद ज्याला ऋत म्हणतात त्या ऋताच्या संवर्धनासाठीं भागवतधर्म जन्मास आला आहे. भागवतधर्मांत भक्तिला प्राधान्य असलें तरी भक्ति म्हणजे भागवतधर्म नव्हे, भागवतधर्माचें मूळ उपनिषधांत असलें तरी त्याची विशेष महती व स्वरुप नारायणीव्याख्यानांत विषद करण्यांत आली आहे. परंतु या धर्मांस व्यवस्थित खुलासेवार व जनतेला अनुसरतां येईल असें रूप भागवतकारानीं भागवत पुराणांत दिलें आहे. यामुळें तात्विकदृष्ट्या भागवतधर्मांचा उगम उपनिषधांत असला तरी व्यावहारीकदृष्ट्या (for practical purpose) भागवत पुराण हाच मूळपाया म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें एकनाथाचा भागवतधर्म समजण्यासाठीं भागवत पुराणोक्त भागवतधर्म समजणें आवश्यक आहे. यामुळें भागवत पुराणांतील भागवतधर्माचें त्रोटक कां होईना पण विवेचन करणें जरूर आहे.


लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

पण तत्पूर्वी ज्या ऋत रक्षणासाठीं भागवतधर्मांचा अवतार झाला आहे तें ऋत म्हणजे काय, त्या मागें कोणती कल्पना आहे याचें थोडेफार स्पष्टीकरण करणें जरूर आहे. कारण त्या खेरीज भागवत धर्माचें रहस्य आकलन होणार नाहीं.

## या धर्माचें वैशिष्ट्य

ऋत या शब्दाचा मुळअर्थ गतिमान असा आहे. (ऋ—इयर्तिंजाणे गति असणें) यामुळें भागवत धर्म गतिमान आहे. समाजधारणेस जरूर असलेल्या गोष्टींची योग्य जोपासना करणें व त्यासाठीं कालपरिस्थितीनुरूप आचार धर्मांत बदल घडवून आणणें हें या धर्माचें वैशिष्ट्य आहे. यामुळें वेळोवेळीं बदलत्या परिस्थितिप्रमाणें लोकांना मार्ग दर्शन करून त्यांच्या आचार विचारांना योग्य वळणांत ठेवण्यासाठीं अवतार वा संत निर्माण होतात अशी या धर्माची धारणा आहे. परिस्थितिमुळें लोकांच्या आचारा विचारांना मुरडी पडत असतात व ज्यावेळेस ही गोष्ट अशा प्रकारची होतें कीं भागवतधर्मांचा मुळपाया जें ऋत त्याला धक्का पोहचण्याचा संभव निर्माण होतो तेव्हां मूळ ऋतास धक्का न लागतां नवीन परिस्थितीस योग्य असा बदल आचारविचारांत घडवून आणण्यासाठीं विष्णू अवताररूपानें अगर संत महंत महात्मे वा श्रेष्ठ विभूतीच्या रूपानें अवतरून विसकटलेली घडी पुन्हां सारखी करून देतो. यदा यदा ही धर्मस्य— या शब्दांनीं श्रीकृष्णानें हेंच व्यक्त केलें आहे. सृष्टी ही गतिमान आहे. स्थिर नाहीं. यामुळें धर्मालाही गतिमान राहवें लागतें. तसा तो न राहिला तर साचलेल्या पाण्या-प्रमाणें गढूळ होऊन कालांतरानें आटूनहि जाण्याचा संभव आहे. वाहते पाणी गढूळ झाले तरी त्याच्या वाहतेपणामुळें नवीन पाण्याची सतत भर पडत गेल्याकारणानें त्याचा गढूळपणा नाहींसा होऊन तें पूर्ववत शुद्ध होतें. असाच प्रकार भागवतधर्मांचा आहे. ऋताचा गतिमान गुण सतत दृष्टीपुढें ठेवल्यामुळें धर्मांच्या आचारात वेळोवेळीं बदल होत आलेला आहे. असे असलें तरी मूळ पाया व त्यास अनुसरून असलेली तत्त्वें व सिद्धांत अबाधित राहिली आहेत.

## विश्वाची उन्नती

ऋत शब्दाचें वेदवाङ्मयांत निरनिराळे अर्थ करण्यांत आले आहेत. त्यांतला गतिमान हा एक अर्थ आहे. विश्वाचे नियम आणि मानवी नीति असाही ऋताचा अर्थ केला जातो. म्हणून विश्वनियमास अनुसरून विश्वोन्नति साधली जाईल अशाप्रकारें मानवी नीतिचें पालन करण्याकडे ह्या धर्मानें विशेष लक्ष पुरविलें आहे. विश्वाच्या विकासाचे शाश्वत तत्त्व व मानवी जीवनाच्या साफल्यास आव-श्यक असलेला धर्म असाही-‐ऋताचा अर्थ होत असल्यामुळें या शाश्वत तत्त्वाची उपासना करून मानवी जीवनास पूर्णता आणणारा मोक्ष ज्यायोगें मिळेल असा आचारधर्म वेळोवेळीं भागवत धर्म सांगत आला आहे. विश्वाची उन्नति

व मानवी कर्तव्यें याचा समन्वय करून सुष्टाचा जय व दुष्टाचा नाश करण्यासाठीं भागवत धर्म जन्मास आला. सुष्ट विकार व दुष्ट विकार यांचा संघर्ष हरघडी चालू असतो. या संघर्षांत सदैव सुष्ट विकारांचा जय व वाढ व्हावी यावर भागवत धर्मांचा विशेष कटाक्ष आहे. ऋत म्हणजे परब्रम्ह- सत्य असाही अर्थ केला जातो. व समत्व दर्शन म्हणजे सत्य होय. असेंही समजतात. म्हणून सर्व प्राणीमात्रांत समत्व पहाण्यांचा दृष्टीकोन या धर्मांचा आहे. ऋतांत जें जें कांहीं अभिप्रेत असेल त्याला यत्किंचीतहि धक्का लागूं न देणारी वागणूक म्हणजे नीति किंवा ज्या वागणुकीनें ऋताचें रक्षण केलें जातें. ती नीति असें भागवत धर्म समजतो.

## भागवत धर्मांचे ध्येय

ऋत रक्षण हे भागवत धर्मांचें ध्येय. माणसानें जें कांहीं करावयाचें तें ऋत रक्षणासाठीं. पाप, पुण्य वा मोक्षासाठीं नव्हे. माणसानें आपला आचार असा ठेवावा कीं ज्यां योगें तें ऋत अबाधित राहील, त्याला धक्का लागणार नाहीं वा त्या विरुद्ध कांहीं घडणार नाहीं. भागवतधर्मांचा हा दृष्टीकोन नीट समजला कीं चांगलें कां करावें व वाईट कां टाळावें याची उकल होऊन धर्मासंबंधाच्या अनेक शंका कुशंका आपोआप गळून पडतात. आजचा मानव बुद्धिवादी असल्यामुळें पाप कां करूं नये! ईश्वर कशावरून आहे? दुसऱ्यास लुबाडून मी सुखी होण्यांत काय बिघडले? वगैरे बुद्धिवाद्यांकडून उपस्थित करण्यांत येणाऱ्या शंकाना, ऋत म्हणजे काय, जें कांहीं करावयाचें जो कांहीं धर्म पाळावयाचा तो ऋताच्या रक्षणासाठीं त्याच्या संवर्धनासाठीं व कार्यासाठीं हें नीट कळलें म्हणजे संयुक्तिक उत्तरें मिळतात. जो हें जाणतो त्याच्या मनांत ईश्वराबद्दल अगर पाप-पुण्याबद्दल शंका निर्माण होत नाहीत, ईश्वराचें अस्तित्व तर्क दृष्ट्या सिद्ध करणें शक्य नसल्यामुळें पाप पुण्य, चांगलें वाईट या कल्पना सापेक्ष असल्यामुळें देवाच्या रागाचीही तमा न बाळगणाऱ्या आजच्या तरुणाला शास्त्राप्रमाणें तर्कदृष्ट्या धर्म पालनाचें महत्त्व आम्हीं पटवून देऊं शकत नाहीं यामुळें धर्मावरील श्रद्धा उडत असून ती शास्त्रांवर अधिकाधिक बसत आहे. दोष तरुणांचा नसून धर्मांची मुखत्यारी असणाऱ्या धर्ममार्तंडांचा आहे. कोणत्याही धर्मांचे शुद्ध रूप आचाराच्या वा रूढीच्या पडद्याआड लपविल्यावर बुद्धि ही धर्मावर केव्हांहि मात केल्याखेरीज राहणार नाहीं, धर्मावरील उडत चाललेली श्रद्धा पुन्हा पुन्हां प्रस्थापित करण्याच्या कामीं भागवत धर्मांतर्गत ईश्वर-चांगले वाईट संबंधींच्या कल्पना कीं ज्या ऋतावर आधारलेल्या आहेत त्या उपयोगी पडतील. म्हणून एकनाथानें विशद केलेलें भागवत धर्मांचें शुद्ध स्वरुप वा एकनाथ प्रणीत भागवत धर्म आजच्या परिस्थितींत मानवाला अधिक उपयुक्त आहे.

## भागवत धर्म व साईबाबा

हाच भागवत धर्म बदलत्या काळास अनुरूप व सोईस्कर अशा रुपांत आण-

ण्याचें कार्य ऋताचें अनुभव देऊन साईबाबांनीं केल्यामुळें त्यांच्या पुढें शंकाकुशंका वादी गळून पडत असत. बदलत्या काळास अनुसरून उपनिषधांतील तत्वांचें विवेचन श्रीकृष्णानें गीतेंत केलें. गीतेचें विशदीकरण नवीन थाटांत ज्ञानेश्वरानें केलें. ज्ञानेश्वराच्या कार्याचें विशदीकरण एकनाथी भागवतांत एकनाथांनीं केलें व फिरत्या काळास योग्य होईल अशा प्रकारचे एकनाथी भागवत धर्माचे विशदीकरण श्री साईबाबांनीं केलें. अशाप्रकारें उपनिषधांत उगम पावलेली भागवत धर्माची गंगा कालोबाशीं सतत समांतर राहात शतकानुशतकें वाहत वाहत शिर्डीपर्यंत येऊन ठेपली व तीं पुढें—पण भविष्य आपण काय सांगावें ?

## भागवत धर्माचा भक्त

एका गोष्टींचा विचार करून हा प्रास्ताविक भाग पूर्ण करूं. भागवत धर्माचा भक्त कसा असतो याचें थोडेसें चित्र आपण कल्पनेने पाहूं. उद्देश हा कीं त्यायोगें कशा प्रकारचे मानव भागवत धर्माच्या अंगिकारानें होतील, भागवत धर्माच्या दृष्टीपुढें कोणता मानवी नमुना आहे, याची थोडी कार कल्पना आपणांस येईल. जो सच्चा भागवत धर्मीय आहे, भागवत आहे तो संसार हा असार असें कधींही मानणार नाही कीं त्याप्रमाणें वर्तणार नाहीं. सतत हरीस्मरणाच्या योगानें व अनासक्ति योगाचें पालन केल्यामुळें प्रपंचांत कर्म करूनही त्याला कर्मबंधनें वा वासना बाधत नाहींत. सर्व प्राणीमात्रांत ऋत पहाण्याच्या त्याच्या दृष्टीमुळें तो सर्वांशीं समबुद्धीनें वागत असतो. उच्च कुलांत जन्मास आला, घरीं लक्ष्मी पाणी भरूं लागली, विद्वत्तेचा मुकुट मिळाला वा उच्चाधिकारभूषीत केला तरी हा भागवत अहंकारानें फुगून जात नाहीं कीं जगाकडे तुच्छ नजरेने पहात नाहीं. ऋताच्या रक्षणासाठीं जगाच्या पालन पोषणासाठीं व अभिवृद्धिसाठीं विष्णुचा अवतार आहे. यामुळें भागवत धर्मांतील या मुळ दैवतावर या भागवताची अपार निष्ठा असते. एवढेंच नव्हे तर आपल्या दैवताचें कार्य तों होईल तितके करीत असतो. यामुळें खरा भागवत जगाच्या विनाशाची, प्राणिमात्राच्या अकल्याणाची नुसती इच्छाही करणार नाहीं मग प्रत्यक्ष हातभार लावणें तर लांबच राहिले. जगाचें कल्याण करणें हें विष्णुचें कार्य असले तरी विष्णू हा कांहीं एकाक्ष नाहीं. यामुळें कल्याणासाठीं अकल्याण, अभ्युदयासाठीं विनाश जरुर असल्यास तोही करण्यास विष्णु मागेंपुढें पहात नाहीं ही गोष्ट रामकृष्णादी अवतारांच्या लिलांतून, कार्यांतून, व पराक्रमांतून, प्रगट झाल्याची जाणीव त्यास असल्यामुळें सच्या भागवत धर्मीय वेळ आली तर ऋत रक्षणासाठीं चांगल्याच्या अभिवृद्धिसाठी वाईटाचा विनाश करण्यास तो मागपुढ पहाणार नाहीं. कोणाच्याही खिशांत कोणी हात घातल्यास तो तो पकडल्याखेरीज राहणार नाहीं. नेभळटपणामुळें वा भित्रेपणामुळें त्याच्या ठिकाणीं शांतपणा आलेला नसून, ऋताच्या उपासनेमुळें जी अंतर्गत शक्ति सामर्थ्यशाली झालेली असतें तिच्यामुळें आलेला

असतो. यामुळें त्याचे अंतःकरण शांतीनें विश्वप्रेमानें जितकें फुललेले असतें तितकेंच तें ऋतविनाशकाविरुद्ध वीरश्रीनें व पराक्रमानें उफाळून येतें व ऋताचें सामर्थ्य त्याच्या पाठीशी असल्यामुळें त्याच्या पराक्रमाला तोंड मिळणे कठीण होते. म्हणूनच तुकारामासारख्या भागवत संताने 'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदू ऐसे' असें म्हटलें आहे एवढेंच नव्हे तर विष्णुच्या कार्याची ही बाजू आपल्या अभंगांतून त्यानें अनेक वेळां जहाल व स्पष्ट भाषेंत व्यक्त केली आहे. हीच गोष्ट पुढें समर्थ रामदासस्वामींनी परिस्थितीस अनुरुप अशा भाषेंत विशद केली. विष्णुच्या ह्या दोन्ही कार्यांवर दृष्टि ठेवून शिवछत्रपतींनीं कार्य केलें व ते अजरामर होऊन गेले. भागवत धर्मांचे हे द्विदृष्टीत्व भागवत भक्ताच्याही ठिकाणीं असल्यामुळें तो अध्यात्माच्या वनांतील ससा होऊन न राहतां वनराज म्हणून फिरते असतो सर्व भूतमात्रांच्या ठायीं ऋताचें अस्तित्व असल्याची त्याला जाणीव असल्यामुळें सर्व प्राणिमात्रांसंबंधीं दयाक्षमा शांति त्याच्या ठायीं वसत असून लोक कल्याणासाठीं तो झटत असतो. अशा वागण्यामुळें एकप्रकारें आपल्याठायीं असलेल्या ऋताचें आपण कार्य करीत असल्यामुळें आपल्या ठायींच्या ऋताचीच आपण अभिवृद्धि करीत आहोंत है तो जाणत असतो.


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक: एस्. व्ही. प्रधान

# जीवन सफल कोणतें ?

मंगल वचनें वाणीनें वदसी ।

तरीच देवाची प्रिय होसी ॥

पुष्कळ मनुष्यांना असें वाटतें कीं जीवनाचें साफल्य व्हावयास मनुष्य दीर्घायु झाला पाहिजे. आपल्याकडे वडील मनुष्य लहानांना शतायु भव म्हणून आशिर्वाद देतात त्याचा अर्थ आयुष्याचीं शंभर वर्षे कशीं तरी घालवा असा नसून शंभर वर्षांच्या दीर्घ आयुष्यांत जीवन पूर्णपणें सफल करा असा असतो. अल्पायुजीवन खरोखरच सुफलित होत नाहीं. कारण कालाच्या अभावीं तसें करण्याला मनुष्याला अवकाशच मिळत नाहीं. तरी सर्वांचेंच अल्पायुष्य व्यर्थ जातें असें मानणें चुकीचें होईल. ज्ञानेश्वरानें सोळा वर्षांच्या जीवनांत जी कामगिरी केली किंवा ध्रुवबाळानें केवळ पांच वर्षांच्या आयुष्यांत दृढ निश्चयानें जी परमेश्वरप्राप्ति करून घेतली ती पाहिली म्हणजे त्यांची जीवनें सार्थकीं लागलीं असेंच म्हणणें भाग आहे.

क्रॉमवेलच्या वेळची एक गोष्ट सांगतात. एकदां हा सेनानायक देवालयांत गेला असतां भिंतीवरील कोनाड्यांत त्याला धुळीनें भरलेल्या खिस्ताच्या बारा पट्ट शिष्यांच्या रुप्याच्या मूर्ति असलेल्या दिसल्या. त्यानें ताबडतोब हुकूम केला कीं मूर्ती खालीं काढून त्या वितळून त्यांचीं नाणीं करून तीं गरिबांच्या उपयोगीं आणावीं. धर्मशुद्धीचा तो काळ होता, व प्यूरिटनांचें वर्चस्व होतें. त्यामुळें हा हुकूम ताबडतोब मान्य करण्यांत आला. ह्या सेनानायकाचें करणें एका अर्थी रास्त होतें. वस्तूचा सदुपयोग झाला पाहिजे, एरव्हीं ती व्यर्थ जाते. हेंच मानवी जीवनाला लागू आहे. तें सुफलित व्हावयाला त्याचा परोपकाराच्या कार्यीं उपयोग झाला पाहिजे. न झाला तर तें व्यर्थ गेलें म्हणून समजावें.

परोपकार करण्याचें मुख्य साधन म्हणजे द्रव्य. तें सर्वांजवळ असतें असें नाहीं. पण द्रव्याच्याच द्वारें परोपकार होतो असें नाहीं. आतां वर जो अभंग आहे त्यांत द्रव्याशिवाय परोपकार व पुण्याचरण करण्याचे पुष्कळ मार्ग दाखवून दिले आहेत. परोपकार करण्याला मोठ्या स्वार्थत्यागाची आवश्यकता आहे असें नाहीं. मंगल आहे असें नाहीं. मंगल वचनांच्या द्वारें आपल्याला कितीतरी कार्य करतां येतें. निराश झालेल्या अंतःकरणांत आशेचा किरण उत्पन्न करतां येतो. त्याच्या द्वारें आनंदप्राप्ति करून देतां येतें; विचारपरिवर्तन करतां येतें. मंगल वचनें उच्चारणाऱ्याला

मंगललेखन करतां येणें अगदी शक्य आहे. एखादें सुंदर पुस्तक लिहून व तें अल्प किंमतीला विकून तरुणांच्या जीवनांत आनंदाची, स्फूर्तीची, आशेची भर घालणें अगदीं शक्य आहे. एखादें सुंदर पुस्तक वाचल्यामुळें जीवनओघच बदलल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. सुंदर पुस्तकांच्या द्वारें वाचकांना अमूल्य सल्लामसलत प्राप्त होते. सत्कार्यी आयुष्य खर्चण्याला प्रोत्साहन मिळतें; सहानुभूति व उत्तेजन ह्यांचा लाभ करून घेतां येतो. ज्याला विशेष स्वार्थत्याग न करतां जीवन यशस्वी करणें आहे त्याला आणखी अनेक साधनांचें अवलंबन करणें शक्य आहे. रुग्णालयांत जाऊन आजारी माणसांची भेट घेणें, त्यांना आशेचे दोन शब्द सांगणें, त्यांचें दुःख कमी करणें, त्यांना फळाफुलांच्या भेटी देणें हा एक मार्ग आहे. अनाथ बालकाश्रमांतील बालकांना कोणत्याहि तऱ्हेचें वेतन न घेतां शिक्षण देणें, दुःखितांना योग्य वेळीं पत्रें लिहिणें, शेजाऱ्यांच्या उपयोगी पडणें, त्यांच्या संबंधानें विचारपूस करणें, असे परोपकाराचें अनेक बिनखर्चाचे मार्ग आहेत. हल्लींच्या काळीं पुष्कळांना पैशापेक्षां प्रेमाची, सहानुभूतीची मोठी जरूरी असते. द्रव्यसाहाय्यानें होणारी मदत तात्पुरती असते, पण योग्य सल्ला देऊन, मनुष्याच्या मनांत आशा उत्पन्न करून त्याला स्वावलंबन करण्यास केलेलें साहाय्य केव्हांहि श्रेष्ठ प्रकारचें होय. उमर आणि अहमद नांवाच्या दोन भावांची गोष्ट सांगतात, "आपलें नांव अजरामर व्हावें म्हणून उमरनें एक स्तंभ उभारला व अहमदानें एक विहीर खणून तिच्या सभोंवार खजुरीचीं झाडें लावलीं. अहमदाच्या कृतीचा वाटसरूंना श्रमपरिहार करण्याला व विश्रांति घेण्याला अत्यंत उपयोग झाला व ते त्याला दुवा चिंतू लागले. उमरची कृति पाहून लोक त्याला नांवें ठेवूं लागले. तात्पर्य जीवन परोपकाराच्या कृत्यांनीं म्हणजे पुण्याचरणानेंच यशस्वी होतें व तें तसें करण्याला द्रव्य साधनाची आवश्यकता नाहीं. अशा प्रकारचें पुण्य कृत्यांनीं भरलेलें जीवित अल्प असलें तरी तें यशस्वी होय.



# श्री. संत दासगणू महाराज यांचे कांहीं वार्षिक उत्सव

************●************

श्री. साईबाबांचे थोर भक्त संतदासगणू महाराज यांनीं बाबांच्या आशीर्वादानें ह्यातभर अध्यात्मिक दृष्ट्या महत्वाचें असें किती थोर कार्य केलें आहे याचा परिचय त्यांचे ऋणानुबंधी श्री. अनंतराव आठवले यांच्या सुंदर चरित्र ग्रंथाच्या आधारें आम्हीं वेळोवेळीं करून दिलेला आहे. श्री. दासगणू महाराज यांचे प्रतिवार्षिक अशा कांहीं महत्त्वाच्या कार्यक्रमाची माहिती पुढें करून देण्यांत येत आहे.—

शिरडीस श्रीसाईबाबा असल्या वेळेपासून रामनवमीच्या उत्सवाची माळ दास-गणूंच्या गळ्यांत पडलेली होती. गेल्या कांहीं वर्षांत प्रकृतीच्या अस्वास्थामुळें ते शिरडीस रामनवमीकरितां गेले नाहींत, पण तोंपर्यंत शिरडीची वारी त्यांनीं कधीं चुकविली नाहीं. मध्यंतरी शिरडी संस्थानच्या कांहीं मंडळींशीं त्यांचे तीव्र स्वरूपाचे मतभेद झाले. त्यांतील कांहींनीं तुम्ही शिरडीसहि येऊं नका, अशीं पत्रें लिहिण्यापर्यंत वेळ आणली. त्या वर्षीं महाराज शिरडीपासून एक मैलावर असलेल्या बोरावक्यांच्या वस्तीवर जाऊन उतरले. तेथें त्यांनीं रामजन्म केला. परंतु हे मतभेद पुढें टिकले नाहींत. महाराजहि मध्यंतरी झालेला त्रास विसरून गेले. पुढें ज्या वेळीं श्री. नागेश आत्माराम सावंत व श्री. श्रीपाद बाळकृष्ण देव हे कार्यकारी मंडळावर आले, त्यावेळीं त्यांनीं सौजन्यानें वागून सर्व मतभेद मिटवून टाकले. आतां श्रमविभागणीच्या तत्त्वावर रामनवमीच्या उत्सवाचा कार्यक्रम श्रीदासगणू महाराजांच्या मागें त्यांच्या पद्धतीप्रमाणें व्यवस्थित पार पडत आहे.

पूर्वीं १९३७ पर्यंत महाराज रामनवमीनंतर दोन सव्वा दोन महिनेपर्यंत शिरडीसच राहात व तेथून ज्ञानेश्वरांच्या पालखीच्या दर्शनासाठीं पुण्यास येत. १९३७ सालीं ते वातकफज्वरानें ( न्यूमोनियानें ) बरेच आजारी होते. डॉ. भडकमकरांनीं चांगल्या हवेवर जाण्याचा सल्ला दिला होता. त्याप्रमाणें नागपूरच्या श्री कृ. वा. जोशी बुवांच्या आग्रहावरून ते १९३७ सालीं प्रथम लोणावळ्यास आले. उन्हाळ्यांतील तेथील हवा महाराजांच्या प्रकृतीस चांगली मानवली. भांगरवाडींतील राममंदिरांत तीन खोल्या घेऊन महाराज राहिले होते. त्यावेळीं पनवेलचे श्री. जाईल, लोणावळा येथील इनामदार श्री. हरिभाऊ भोंडे या राममंदिराच्या विश्वस्तांनीं महाराजांनीं प्रतिवर्षीं उन्हाळ्यांत लोणावळ्यासच यावें, अशी विनंति केली. राममंदिराच्या आवारांतील जागा महाराजांना उतरण्यासाठीं प्रतिवर्षीं कोणतेंहि भाडें न आकारतां द्यावी, असा कार्यकारी

मंडळानें ठराव केला. मंदिराचे विश्वस्त व राममंदिराचे पुजारी श्री. विश्वनाथ त्रिकमजी जोशी हे गृहस्थ महाराजांचे अनुग्रहितच बनले. या ऋणानुबंधामुळें व चांगल्या हवेमुळें महाराज मग प्रतिवर्षी लोणावळ्यास येऊं लागले. परशुराम जयंती, शंकराचार्य पुण्यतिथि, नृसिंहजयंती हे उत्सव मग लोणावळ्यासच होऊं लागले. दशहराच्या उत्सवाला लोणावळा येथें राहण्यानें विशेषच मोठें स्वरूप प्राप्त झालें. आज या उत्सवानिमित्त दहा दिवसपर्यंत रोज सकाळीं रुद्राभिषेक व संध्याकाळीं गंगामाहात्म्याचें वाचन, गंगालहरीवर प्रवचन व बसून कीर्तन असा कार्यक्रम असतो, जेष्ठ शुद्ध दशमीच्या दिवशीं गोदेच्या समाराधनेनिमित्त दीड दोनशें पानहि होतें.

लोणावळ्याहून ज्ञानेश्वरांच्या पालखीच्या दर्शनासाठीं महाराज पुण्यास येत. श्रीदासगणू महाराजांच्या गुरुंची श्रीसद्गुरु वामनशास्त्री यांची पुण्यतिथि जेष्ठ वद्य एकादशीस असते. हा उत्सव दशमी, एकादशी, द्वादशी असा तीन दिवसांचा असतो. तिन्ही दिवस कीर्तन असतें. शेवटचें कीर्तन काल्याचें होतें. १९४८ सालपर्यंत महाराज पुण्याच्या मुक्कामांत श्री. वहिनीबाई जोगळेकर यांच्या बिऱ्हाडीं राहत असत. त्यावेळीं या पुण्यतिथि उत्सवाचीं कीर्तनें मंडईजवळ साखरे महाराजांच्या मठांत होत असत. नंतर माझ्या रहाण्याच्या ठिकाणापासून गायआळीतील श्री. रहाळकरांचें राममंदिर अगदीं जवळ असल्यानें ही कीर्तनें तेथें होत. द्वादशीच्या दिवशीं समाप्तीस शें-सव्वाशें पान होतें. पुण्याचा महाराजांचा मुक्काम श्रावणी होतांच बहुधा हाले. मधें थोडे दिवस एखाद्यां वर्षी नगरास श्री. नानासाहेब बागडे यांच्याकडे राहून तेथून महाराज नांदेडास जात. श्री. धोंडोपंत बाबासाहेब नांदेडकर वकील होते, तोंपर्यंत महाराज नांदेडास फार दिवस राहात असत. नांदेडास कधीं जाईन, अशी ओढ त्यांना लागलेली असे. श्री. बाबासाहेबांविषयीं महाराजांना अत्यंत जिव्हाळा होता. पोटकळीचें तें ठिकाण होतें. श्री. बाबासाहेबांनाहि महाराजांचें बोलणें म्हणजे वेदवाक्य असे. अनेक जन्मींचा हा ऋणानुबंध असावा, असें वाटण्याइतकी दृढता त्यांच्या स्नेहामध्यें होती. यांना उद्देशून महाराज श्रीगुरुचरित्रसारामृता शेवटीं म्हणतात, " नांदेड ग्रामाभीतरी । धोंडोपंत वकिला घरीं । ग्रंथ पुरा झाला हा ॥ हा धोंडोपंत सज्जन । देशस्थ अश्वलायन । धर्मश्रद्धा पूर्ण । दंभाचारी मुळीं नसे ॥ हा मम जन्मांतरीचा । कोणीतरी आप्त साचा । असावा म्हणून आमुचा । स्नेह जाहला या जन्मीं ॥ " श्री. बाबासाहेब १९४१ सालीं कैलासवासी झाले. मग श्री. बाबासाहेब नसलेल्या नांदेडास जाण्यास महाराजांचें मन घेईना. तरी श्री. बाबासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. दिगंबरनाना होते तोंपर्यंत त्यांच्या प्रेमासाठीं महाराज क्वचित् नांदेडास जात. सध्यां मोंगलाईंतील त्यांचें राहणें उमरी स्टेशनहून कोसभर दूर असलेल्या गोरटें या गांवीं असतें, तेथील जमीनदार श्री. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रेरणेनें एक लहानसें घर मोंगलाईंतील मंडळींनीं महाराजांच्या करितां बांधलें आहे. श्री. देशमुखांच्या प्रेमाखातर महाराज तेथेंच रहात. व पुढें

संन्यास घेऊन गोरट्यासच वास्तव्य करावें, अशी महाराजांची मनीषा होती.

दसऱ्याचे वेळीं महाराज पंढरपुरास येत. अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशापर्यंत नव-रात्रामध्यें रात्रीं श्रीरुक्मिणी मातेपुढें प्रतिवर्षी त्यांची दहा कीर्तनें होत असत. दसऱ्याच्या दिवशी श्रीसाईबाबांची पुण्यतिथि येते. त्यानिमित्त सकाळीं सात आठ ब्राह्मणांच्या द्वारां पवमान रुद्राचा अभिषेक देवावर होऊन शिवविष्णूंच्या सहस्रनामांच्या उच्चारासह हजार बेल व हजार तुळशी वाहिल्या जात. दुपारीं समाराधना होई. १९४२ सालपर्यंत सात आठशें पान या दिवशीं होत असे. पुढें अन्न धान्यावर नियंत्रण आल्यामुळें हें प्रमाण फारच कमी झालें होतें. नंतर पुन्हां वाढूं लागलें. दसऱ्यापासून मकरसंक्रांतीपर्यंत सुमारें चार महिने महाराज पंढरपुरासच असत. कार्तिक वद्यांत येणारा श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यतिथिचा उत्सव महाराज मोठ्या प्रमानें साजरा करीत. रोज सकाळीं अभिषेक व निरनिराळ्या धार्मिक ग्रंथांचें वाचन असा कार्यक्रम असे. संध्याकाळीं कीर्तन होतें. पांचव्या दिवशीं काला होतो. कार्तिक वद्य त्रयोदशी या पुण्यतिथीच्या मुख्य दिवशीं सकाळीं पांच ब्राह्मणांकरवीं पवमान रुद्राचा अभिषेक होतो. दुपारीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या प्रसादास शें-दीडशें लोक जेवत.

वार्षिक कार्यक्रमामध्यें आपल्या परिवारांतील मंडळींना मकरसंक्रांतीच्या निमित्तानें काव्यमय संदेश पाठविणें, हें एक मोठें काम आहे. पांच सहाशें लोकांना तरी हीं पत्रें पाठविलीं जात. त्यामुळें ती छापूनच घ्यावीं लागत. एकाच गांवांत राहणाऱ्या व एकमेकांशीं परिचित असणाऱ्या माणसांना क्वचित् एकत्रहि या पत्रिका पाठविण्यांत येत. नमुना म्हणून त्यांतील दोन तीन पद्यें खालीं दिलीं आहेत.

> " हा धाडिलेला तिळगूळ घ्यावा । परस्परीं लोभ विशेष ठेवा ।
> एकी असे जी बहु सौख्यकारी । राखा तिला यत्न करून भारी ॥ होवो
> संक्रम आपुलाहि रविसा, जावो लया भीरुता । येवो शौर्य सुजांत धैर्य
> हृदयीं बुद्धींत तेजस्विता । राहो प्रेम अपार संस्कृतिवरी, हो बंधुता
> अंतरी, स्वातंत्र्यें भगवा सदैव फडको, तेणें हिमाद्रीवरी ॥ स्वधर्म
> स्वजनावरी अमित प्रेम तें ठेवणें । स्वराष्ट्र हित साधण्या । सतत सज्ज कीं
> राहणें । असे श्रुतिज आपुला जगति धर्म त्या मानणें । तयांत मलतीं
> खुळें धरून हट्ट ना काढणें । पक्षोपपक्ष न करा धरूनी सुनीती ॥
> बाराखड्यापरिस या अपुल्यांत जातीं । त्या ना करा कधींच कारण भांडणाला ।
> झालें स्वराज्य अपुलें टिकवा तयाला ॥ "

संक्रांतीनंतर सामान्यतः पंढरपुराहून महाराजांचा मुक्काम हाले. त्यानंतर १९३७ सालापर्यंत म्हणजे न्युमोनियाच्या मोठ्या दुखण्यानें आजारी पडेपर्यंत प्रतिवर्षी

महाराज मोडलिंबजवळील अरणास श्रीसंत सांवतामहाराजांच्या दर्शनासाठीं येत. एक दिवस तेथें राहून अभिषेक नैवद्यादि कृत्यें करून दुसरे दिवशीं बैलगाडीनें लहुळच्या हद्दींतील, पण पडसाळी स्टेशनाजवळ असलेल्या कूर्मदासाच्या समाधीच्या दर्शनास जात. ही जागा पूर्वी इतकी मलिन, पडकी, धूळ आणि काट्याकुट्यांनीं भरलेला असे कीं, स्वयंपाकापुरती जागा साफसूफ करून घेण्यास दोन तीन तास लागत. वारा सुटला कीं फार धूळ उडे. जेवण नकोसें वाटे. जवळ एक विहीर आहे, पण तिचें पाणी कालासारखें गार असे. नेहमीं गार पाण्याची संवय असणाऱ्यानाहि तेथील पाण्यामुळें अंगावर कांटा उभा राही. कूर्मदासाच्या समाधीचें औरंगजेबाच्या कारकीर्दींत मशिदींत आणि तुर्बंकींत रूपांतर झालेलें आहे. अशा या ठिकाणीं दासगणू महाराज प्रतिवर्षी नेमानें येत. सकाळीं पूजा, अभिषेक करून कीर्तन करीत. स्वयंपाक करून नैवेद्य दाखवीत. जेवण करून पोथी वाचीत आणि संध्याकाळीं पुढें पडसाळी स्टेशनवरून कुर्डुवाडीस जाण्यासाठीं निघत. कांहीं मंडळींच्या खटपटीनें या स्थानास आज पुष्कळच नीटनीटकें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. पण १९३४ पर्यंत तरी एखाद्या ओसाड जागेप्रमाणें हें समाधी स्थळ भयाण आणि अस्वच्छ होतें. या अत्यंत प्रतिकूल वातावरणाचाहि महाराजांच्या व्रतनियमांवर परिणाम झाला नाहीं. ते संतप्रेमानें कूर्मदासाच्या दर्शनासाठीं जात. कांहीं वेळ घालविण्याच्या विश्रांतीचें स्थळ म्हणून नव्हे, तीर्थयात्रा करणारांनीं ही वृत्ति लक्षांत घेण्यासारखी आहे. कूर्मदासाच्या समाधीपुढील कीर्तनांत श्रवणासाठीं एकहि श्रोता खरोखरीच नसे. गांवापासून पुष्कळच दूर असलेल्या त्या ठिकाणीं तसे कोणी ऐकावयास येण्याची शक्यताहि नसे; परंतु श्रीराममहाराजांच्या कीर्तनरंगांत यत्किंचित्‌हि उणीव येत नसे. हा विशेष कीर्तनकारांनीं ध्यानांत ठेविला पाहिजे.

कुर्डुवाडीस आल्यानंतर महाराज कै. हरि विनायक वैशंपायन यांच्याकडे राहात. पुढें श्री. वैशंपायनांची कुर्डुवाडीहून बदली झाल्यानंतर श्री. बापूराव जोशी ऑडिटर यांच्याकडे राहात. हा मुक्काम पुढें श्रीकल्याणस्वामींच्या डोंबगांवास जाण्याच्या तयारीसाठीं असे. बैलगाडीनें परांड्याहून डोंबगांवास जाण्याचा रस्ता आहे. कुर्डुवाडी ते डोंबगांव हें अंतर साधारणपणें १० कोसांचें आहे. रस्ता अत्यंत खडकाळ आणि रूक्ष असा आहे. बैलगाडीच्या प्रवासांत अंग ठेचकाळून अक्षरशः खिळखिळें होई, पण तरीहि महाराजांना त्याचा शीण वाटत नसे. वयाच्या ७२ व्या वर्षापर्यंत ही यात्रा त्यांनीं निष्ठेनें केली. डोंबगांवचा दर्शन, अभिषेक, नैवेद्य असा कार्यक्रम पार पाडून महाराज दुसरें दिवशीं परांड्यास परत येत. तेथें श्री. विनायकराव वकील यांच्याकडे महाराजांचा मुक्काम असे. परांड्यास हंसराज स्वामींच्या दर्शनास ते येत. तेथेंहि पूजा अभिषेकादि कार्यक्रम करून एकाद दुसरा दिवस राहून ठरविलेल्या बैलगाडीनें कुर्डुवाडीस परतत. तेथून पुढें मोंगलाईंत जात. कारण मांघ वद्य नवमीचा श्रीरामदासस्वामींच्या पुण्यति-

थीचा उत्सव तिकडेच व्हावयाचा असे.

माघ वद्यांतील श्रीदासनवमीचा उत्सव आतांपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं झालेला आहे. गव्हाण, अतनूर, मुखेड, कळंनुरी, उमरी इत्यादि निरनिराळ्या गांवीं तेथील मंडळींच्या आग्रहावरून महाराज जात असत व तेथेंच हा उत्सव होई. कार्यक्रम इतर उत्सवाप्रमाणेंच असे. फाल्गुन वद्यांतील तुकारामबोवांची बीज व नाथषष्ठी हा संयुक्त उत्सव पूर्वीं मोठ्या थाटानें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नार्नाळीस होत असे. अलीकडे गोरट्यासच होतो. श्रीतुकारामबोवांच्या बीजेच्या दिवशीं गोरट्यास एक अभिनव प्रथा महाराजांच्या प्रेरणेनें सुरूं झाली आहे. दहा बारा गांवाहून गाड्या भरून भाकरी येतात. गोरट्यास आमटी तयार केली जाते व त्यांचा भंडारा होतो. दोनअडीच हजार लोक या दिवशीं जेवून जात. लांबलांबवूनहि प्रसादाची भाकरी मिळण्यासाठीं लोक गोर-ट्यास येत. या उत्सवांत कीर्तनादि कार्यक्रम नेहमींप्रमाणें होत. महाराजांच्या या सर्वजनसुलभ अशा धार्मिक कार्यक्रमामुळें अनेकांना सदाचाराचें वळण लागलें अनेकांनीं मानसिक समाधान अनुभविलें आहे. अनेक लोक आपल्या जीवनांत स्थिर झाले आहेत. ईश्वरी कृपाप्रसाद हा इहलोकींहि मनःशांतीच्या दृष्टीनें लाभदायक होतो, याचा प्रत्यय अनेकांनीं घेतला आहे. त्यामुळें या उत्सवांत भाग घेण्याची संधि मिळावी व त्या निमित्तानें महाराजांच्या सहवासाचा लाभ मिळावा, अशी इच्छा अनेक ठिका-णच्या लोकांची असे. त्यामुळें हें निरनिराळे उत्सव असतील त्याच्या आधीं महिना-भर महाराजांकडे येणाऱ्या पत्रांची संख्या अनेक पटीनीं वाढे.

ज्या वर्षी अधिकाचा उत्सव असेल त्या वर्षी तर चार चार महिने आधीं हा पत्र व्यवहार सुरूं होई. उत्सव तीस दिवसांचा व रोज कीर्तन यामुळें आपल्या गांवींच हा उत्सव व्हावा, अशी अहमहमिका सुरूं होई. त्यामुळें महाराजांचे अधिकाचे उत्सव निरनिराळ्या ठिकाणीं झाले आहेत. श्री. बाबासाहेब नांदेडकर होते, तोंपर्यंत मात्र बहु-तेक सर्व अधिक मास नांदेडासच होत. इतर मंडळींना त्यावेळीं महाराजांच्या ऐवजीं या वेळीं उत्सव आमचे गांवीं होऊं देण्याची कृपा करावी ' अशी विणवणी श्री. बाबा-साहेबांसच करावी लागे आणि कांहीं वेळां तरी श्री. बाबासाहेबांना होय म्हणावें लागे.

शके १८३७ चा अधिक वैशाख असतांना गोदातीरावरील रामेश्वर या ठिकाणीं घडलेली या उत्सवांतील हकीगत मनोरंजक आणि बोधप्रद आहे. उत्सवाकरितां फार लांबलांबून लोक येऊं लागले. त्यांची ती प्रमाणाबाहेर वाढणारी संख्या पाहून महा-राज जरा विचारांत पडले. भोंवतालच्या सावकार मंडळींनीं सांगितलें कीं, ' आपण कांहीं चिंता करूं नका. कितीहि लोक येऊं द्या. आम्ही सर्व मिळून त्यांची सर्व व्यवस्था ठेवूं. उत्सव आनंदांत होऊं दे. ' उत्सवाकरितां आलेल्या दोन चार मंडळींना महारा-

जांनीं मुद्दाम विचारलें. ' या उत्सवासाठीं इतक्या दूर अंतरावरून येण्याचें प्रयोजन काय ? ' त्यांनीं सांगितलें, ' महिनाभर आपल्या उत्सवास जा, असें मला स्वप्न पडलें, य बोलण्यामध्यें लबाडी आहे, हें महाराज तेव्हांच समजून गेले. त्यांनीं श्री. पर्वतराव गोसावी यांना हांक मारून सांगितलें कीं, " पर्वता, सगळ्या सावकार लोकांना सांग कीं, उद्यांपासून सर्व प्रकारचीं जेवणें बंद. कडुनिंबाच्या पाल्याचा रस खाऊन अधिक मास करावा, असें स्वप्न मला काल पडलें आहे. " झालें. ही आज्ञा कटाक्षानें अंमलांत आली. श्री. पर्वतराव गोसावी हे महाराजांचे निग्रही भक्त. हटयोगाचा यांचा व्यासंग चांगला. महाराजांच्यावर निष्ठा अतिशय. महाराज यांच्याशीं बोलतांना नेहमीं थट्टेचें आणि उपहासाचेंच बोलतात. पण त्याचा यत्किंचित्‌हि राम न धरतां ते आपले सेवातत्पर असतातच. या बोवांचे डोळे इतके तेजस्वी आहेत कीं, पाहणाराला त्यांची भीतिच वाटावी. भर उन्हाळ्यामध्यें महाराजांच्या आज्ञेवरून यांनीं एका माळावर बसून पाणपोई चालविली होती. उन्हानें करपून अंग लोखंडासारखें राकट झालें होतें, पण काम सोडलें नाहीं. या निग्रही स्वाभावामुळें कडुनिंबाच्या पाल्याच्या आज्ञेमध्यें त्यांना कांहीं विशेष वाटलें नाहीं. त्यांनीं भराभर पाला काढून आणला, वाटला व गोदावरीचें स्वच्छ शीतल पाणी घालून त्याचें हिरवेंगार पेय बनविलें. पांच पंचवीस लोटे भरले. येणाराजाणाराला हा प्रसाद मिळूं लागला. आतां तेथें कोण राहणार ? स्वतः महाराज कडुनिंबाचा दोन लोटे रस प्याले. पर्वतरावांनीं तसेंच केलें. श्री. दामुअण्णांच्या बरोबर महाराजांची साथ करणारे श्री. किसनराव आबाजी कासार यांनींहि तो रस घेतला. अर्थात् बाकीच्यांना त्यांत भाग घ्यावाच लागला. पण दोन चमचे रस कांहीं त्यांच्या घशाखालीं उतरला नाहीं. जेवणाला अजिबात फाटा आणि लिंबाच्या रसाचें प्राशन दोन दिवसांत रामेश्वर जवळ जवळ निर्मनुष्य झालें ! जणुं परत घरीं जाण्याचीं स्वप्नें सर्वांना पडलीं ! दोन दिवस महाराजांनीं ही परिक्षा चालू ठेविली होती. ते स्वतः आणि त्यांचे दोन शिष्य यांच्या निग्रहामुळें इतरांना निमुटपणें गाशा गुंडाळावा लागला. बहुतेक सगळे निघून गेले. बाकीच्या थोड्यांनीं आसपासच्या गांवातून आपली सोय पाहिली. तेव्हां महाराज म्हणाले, " उत्सवाला येण्याची स्वप्नें पाहिलींत काय जातीचीं आहेत तीं ! ' शितें तवरती भुतें भोंवतीं ' असें रामजोशीबोवा म्हणतात तें उगीच नाहीं " महाराज परीक्षा किती कडकपणें घेत, हें यावरून प्रत्ययास येतें.


( १८७७ ) महाराजांचा अधिक मास उमरी येथील श्रीविठ्ठल मंदिरांत थाटानें झाला. हें विठ्ठलमंदिर महाराजांच्या आज्ञेमुळेंच उमरीकर मंडळींनीं उत्तम प्रकारें बांधलें आहे. त्यामुळ महाराजांनीं त्या मंदिरांत कांहीं दिवस वास करावा, अशी उमरीकरांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. महाराज अधिकासाठीं उमरीला येणार आहेत, हें कळतांच तेथील मंडळाला अतिशय आनंद झाला, हे त्यांचीं आलक्ष पत्रें

तांच प्रत्ययास येतें. श्री. संगमनाथ अप्पा सोमावार, श्री. बापूराव तळेगांवकर, श्री. वेंकटलाल सारडा, श्री. बाबासाहेब गोरटेकर, श्री. लक्ष्मण घनपलवार, श्री. किसन महाजन, श्री. भागवत नवबलवार, इत्यादि उमरीच्या प्रमुख सद्‌गृहस्थांची अत्यंत हर्ष-झाल्याचीं पत्रें महाराजांकडे आलेलीं होतीं.

निरनिराळ्या ठिकाणच्या भाविक मंडळींच्या आग्रहावरून महाराज आपल्या कार्यक्रमाव्यतिरिक्त सवड असेल तर त्याप्रमाणें इतर ठिकाणींहि कांहीं दिवस जाऊन राहात आले आहेत. हें राहणें बहुधा पुण्याचा मुक्काम हलल्यानंतर आणि पंढरपुरचा मुक्का हलल्यानंतर मधी काळांत होतें.


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, आंभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर — डी. एच्. साखरकर

# जीव जीवांत घालावा

—संत विनोबा

अर्जुनासारखी ऋजुता आणि हरिशरणता असली म्हणजे विषादाचाहि योग बनतो. ह्यालाच हृदय-मंथन म्हणतात. मी गीतेच्या ह्या भूमिकेला संकल्पकारांप्रमाणें अर्जुन-विषाद-योग असें विशिष्ट नांव न देतां विषाद-योग असें सर्वसामान्य नांव दिलें आहे. कारण गीतेला अर्जुन केवळ एक निमित्त आहे. पंढरीच्या पांडुरंगाचा अवतार पुंडलीकासाठीं झाला असें नाहीं. पुंडलीकाचें निमित्त करून तो आम्हां जड-जीवांच्या उद्धारासाठीं आज हजारों वर्षें उभा आहे. हें आम्ही पाहतों. त्याप्रमाणेंच गीतेची दया अर्जुनाच्या निमित्तानें झाली तरी ती आपणां सर्वांसाठीं आहे. म्हणून गीतेच्या पहिल्या अध्यायाला विषाद-योग हें सामान्यनावच शोभतें.

दुसऱ्या अध्यायापासून गीतेच्या शिकवणीस आरंभ झाला आणि आरंभीच भगवान् जीवनाचे महासिद्धान्त सांगत आहेत. ज्यांवर जीवन उभारावयाचें तीं जीवनाचीं मुख्य तत्त्वें आधीं गळीं उतरलीं म्हणजे पुढचा मार्ग सरळ होऊन जाईल अशी ह्यांत दृष्टि आहे. गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील सांख्य-बुद्धि ह्या शब्दाचा अर्थ जीवनाचें मूलभूत सिद्धान्त असा मी करीत आहे. हें मूळ सिद्धान्त आतां आपणांला पहावयाचे आहेत. पण तत्पूर्वीं ह्या सांख्य-शब्दाच्या प्रसंगानें गीतेंतील पारिभाषिक शब्दांच्या अर्थांविषयीं थोडासा खुलासा करून घेणें बरें होईल.

गीतेला जुने शास्त्रीय शब्द नवीन अर्थानें वापरण्याची संवय आहे. जुन्या शब्दांवर नवीन अर्थांचें कलम करणें ही विचारक्रांतीची अहिंसक प्रक्रिया आहे. व्यासांचा ह्या प्रक्रियेंत हातखंडा आहे. त्यामुळें गीतेंतील शब्दांना व्यापक सामर्थ्य येऊन गीता टवटवीत राहिली, आणि अनेक विचारकांना त्यांच्या त्यांच्या गरजेप्रमाणें आणि अनुभवाप्रमाणें अनेक अर्थ घेतां आले. हें सर्व अर्थ त्या त्या भूमिकेवरून योग्य असूं शकतात आणि त्यांचा विरोध करण्याची गरज न पडतां आपण स्वतंत्र अर्थ करूं शकतों अशी माझी दृष्टि आहे.

ह्या संबंधानें उपनिषदांत एक सुंदर गोष्ट आहे. एकदां देव, दानव आणि मानव प्रजापतीकडे उपदेशार्थ गेले. प्रजापतीनें सर्वांना 'द' हें एकच अक्षर दिलें. देव म्हणाले, "आम्ही देव कामी, भोगांना चटावलेले. आम्हांला 'द' अक्षरानें दमन करा असें प्रजापतीनें शिकविलें." दानव म्हणाले, "आम्ही दानव क्रोधी, दयेला पारखे झालेले. आम्हांला 'द' अक्षरानें दया करा, असें प्रजापतीनें शिकविलें."

मानव म्हणाले, " आम्ही मानव लोभी, संचयाच्या मार्गी लागलेले. आम्हांला ' द ' अक्षरानें दान करा असें प्रजापतीनें शिकविलें. " प्रजापतीनें सर्वांचे अर्थ बरोबर मानले. कारण सर्वांना स्वानुभवांतून ते लाभले होते. गीतेंतील परिभाषेचा अर्थ करतांना उपनिषदांतली ही गोष्ट आपण चित्तात बाळगावी.

दुसऱ्या अध्यायांत जीवनाचे तीन महासिद्धान्त मांडले आहेत:—( १ ) आत्म्याची अमरता आणि अखंडता ( २ ) देहाची क्षुद्रता ( ३ ) स्वधर्माची अबाध्यता. असे तीन सिद्धान्त आहेत. ह्यांतील स्वधर्माचा सिद्धान्त कर्तव्यरूप आहे, आणि बाकीचे दोन ज्ञातव्य आहेत. स्वधर्माविषयीं मीं मागच्या खेपेला थोडेसें सांगितलेंच होतें. हा स्वधर्म आपणांस निसर्गतःच प्राप्त होतो. स्वधर्म शोधावा लागत नाहीं. आपण आकाशांतून पडलों व भूमीवर सांवरलों असा कांहीं प्रकार नाहीं. आपला जन्म होण्यापूर्वी हा समाज होता. आपले आईबाप होते, शेजारी होते. अशा ह्या प्रवाहांत आपण जन्मतों. ज्या आईबापांच्या पोटीं मीं जन्म घेतला त्यांची सेवा करण्याचा धर्म मला जन्मतःच मिळाला आहे. ज्या समाजांत जन्मलों त्या समाजाची सेवा करण्याचा धर्म मला ओघानेंच प्राप्त झाला आहे. आपल्या जन्माबरोबरच स्वधर्महि जन्मतो, किंवा तो आपल्या जन्माच्या आधींच आपल्यासाठीं तयार असतो असेंहि म्हणतां येईल. कारण तो आपल्या जन्माचा हेतु आहे. तो पार पाडण्यासाठीं आपण जन्मलों आहों. स्वधर्माला कोणी पत्नीची उपमा देतात. आणि पत्नीचा संबंध ज्याप्रमाण अविच्छेद्य मानला आहे त्याप्रमाणें स्वधर्माचा संबंध अविच्छेद आहे असें वर्णन करतात. मला हीहि उपमा गौण वाटते. मी स्वधर्माला आईची उपमा देतों. माझी आई मला ह्या जन्मांत निवडावयाची उरलेली नाहीं. ती अगाऊचीच सिद्ध आहे. ती कशीहि असो, माझी टळूं शकणार नाहीं. ही स्थिति स्वधर्माची आहे. आपणांला ह्या जगांत स्वधर्माशिवाय दुसरा कोणताहि आश्रय नाहीं. स्वधर्माला टाळूं पाहणें म्हणजे ' स्व ' लाच टाळूं पाहण्यासारखें आत्मघातकीपणाचें आहे. स्वधर्माच्या आश्रयानेंच आपण पुढें जाऊं शकतों. म्हणून तो आश्रय कोणीं कधींहि सोडूं नये, हा जीवनाचा एक मूलभूत सिद्धान्त ठरतो.

स्वधर्म हा इतका सहज-प्राप्त आहे कीं, माणसाच्या हातून सहज त्याचेंच आचरण व्हावें. पण अनेक प्रकारच्या मोहामुळें तें होत नाहीं, अथवा फार मुश्किलीनें होतें, आणि झालें तरी त्यांत विष कालवलें जातें. स्वधर्माच्या मार्गांत कांटे पसरवणाऱ्या मोहाची बाह्य रूपें तर असंख्यच आहेत. तथापि त्यांचें विश्लेषण केलें म्हणजे त्या सर्वांच्या मुळाशीं जी एक मुख्य गोष्ट दिसून येते ती संकुचित आणि उथळ देह-बुद्धि. मी आणि माझ्या शरीर संबंधाचीं माणसें एवढीच माझी व्याप्ति. ह्यांच्या बाहेरचे सर्व लोक परके अथवा दुष्मन, अशी भेदाची भिंत ती उभी करते. आणि मी किंवा माझे म्हणून मानलेले जे, त्यांचेंहि ती शरीरच पाहते. देहबुद्धीच्या ह्या दुहेरी कोंडीत सांपडून आपण

तऱ्हेतऱ्हेचीं डबकीं निर्माण करूं लागतों. बहुतेक सगळे ह्याच कार्यक्रमांत असतात. कोणाची डबकीं लहान तर कोणाचीं मोठी; परंतु कांहीं झालें तरी तीं डबकींच. ह्या शरीराच्या चामडीइतकीच त्यांची खोली. कोणी कुटुंबभिमानाचें डबकें करून राहातो, कोणी देशाभिमानाचें डबकें करून राहतो, ब्राह्मण-ब्राह्मणेतर डबकीं, हिंदु-मुसलमान डबकीं, एक ना दोन अनंत डबकीं, जिकडे पहाल तिकडे तींच तीं. आपण ह्या जेलमध्यें सुद्धां राजकीय कैदी अशीं डबकीं केलींच आहेत. त्याशिवाय आपणांस जगदतच जसें नाहीं. परंतु ह्याचा परिणाम काय होतो ? परिणाम एकच. हीन विचारांचे जंतु आणि स्वधर्मरूप आरोग्याचा नाश. अशा स्थितींत स्वधर्मनिष्ठा एकाकी पुरी पडत नाहीं. तिच्यासाठीं दुसरे दोन सिद्धान्त जागृत ठेवावे लागतात. मी मरतुकडा देह नव्हे, देह केवळ वरचा क्षुद्र पापुद्रा आहे, हा एक सिद्धान्त. मी कधींहि न मरणारा, अखंड आणि व्यापक आत्मा आहे, हा दुसरा सिद्धान्त. हे दोन्ही मिळून एक पूर्ण तत्त्वज्ञान होते.

हें तत्त्वज्ञान गीतेला इतकें अगत्याचें वाटतें कीं, गीता त्याचेंच आवाहन आधीं करून स्वधर्माचा अवतार मागाहून करते. कोणी म्हणतात हें तत्त्वज्ञानाचे श्लोक प्रारंभीच कशाला ? पण जर गीतेंतल्या कोणत्या श्लोकांची जागा मुळींच बदलतां येण्यासारखी नसेल तर ती ह्या श्लोकांची असें मला वाटतें.

एवढें तत्त्वज्ञान जर चित्तांत ठसलें तर स्वधर्म मुळींच जड जाणार नाहीं. इतकेंच काय स्वधर्माहून दुसरें कांहीं करणें जड जाईल. आत्मतत्त्वाची अखंडता आणि देहाची क्षुद्रता ह्या गोष्टी समजण्याला कठिण नाहींत. कारण त्या सत्य वस्तु आहेत. पण त्याचा विचार केला पाहिजे. त्या वारंवार चित्तांत घोळल्या पाहिजेत. ह्या कातडीचें महत्त्व कमी करून आत्म्याला महत्त्व द्यावयास आपण शिकलें पाहिजे.

हा देह तर क्षणाक्षणाला बदलतो आहे. बाल्य, तारुण्य, जरा, हें चक्र सर्वांच्या अनुभवाचें आहे. आधुनिक शास्त्रज्ञ तर सांगतात, सात वर्षांत शरीर पार बदलून रक्ताचा जुना थेंब शरीरांत शिल्लक राहात नाहीं. बारा वर्षांत जुनें शरीर मरून जातें असें आपले पूर्वींचे लोक मानीत आणि प्रायश्चित्तें, तपश्चर्या, अध्ययन, इत्यादींच्या मुदती बारा बारा वर्षांच्या राखीत. पुष्कळ वर्षांच्या वियोगानंतर मुलगा भेटला तर आई त्याला ओळखूं शकली नाहीं, अशा गोष्टी आपण ऐकतो. असा हा प्रतिक्षणीं बदलणारा, प्रतिक्षणीं मरून राहिलेला देह, हें का तुझें रूप ? रात्रंदिवस जेथें मल-मूत्रांच्या धारा वाहत आहेत, आणि तुझ्यासारखा खंबीर धुणारा भेटला असून ज्याचें अस्वच्छतेचें व्रत सुटतच नाहीं, तो का तूं ? तो अस्वच्छ, तू त्याला स्वच्छ करणारा; तो रोगी, तूं त्याला औषधपाणी देणारा; तो साडेतीन हात जागेंत पडून राहिलेला, तूं त्रिभुवन विहारी; तो नित्य परिवर्तनशील, तूं त्याचीं परिवर्तनें पाहणारा; तो मरणारा, आणि तूं त्याच्या मरणाचा व्यवस्थापक. इतका तुझा आणि त्याचा भेद स्पष्ट असतांना तूं संकु-

चित कसा बनतोस ? देहसंबंध तेवढेच माझे काय म्हणतोस, आणि देहाच्या मृत्यू-बद्दल शोक तरी काय करतोस ? भगवान् विचारतात, " देहाचा नाश ही का शोक-करण्यासारखी वस्तु आहे ? "

देह तर वस्त्रासारखा आहे. जुना फाटतो म्हणून नवा घेतां तरी येतो. एकच एक देह आत्म्याला कायमचा चिलगून असता तर आत्म्याची धडगत नव्हती. सारा विकास थांबता, आनंद लोपता, ज्ञानप्रभा मंदावती. म्हणून देहाचा नाश शोचनीय नव्हे, आत्म्याचा नाश होत असला तर ती फार शोचनीय गोष्ट झाली असती. पण तो तर अविनाशी आहे. आत्मा एक अखंड वाहता झरा आहे. त्यावर अनेक देह येतात आणि जातात. म्हणून देहाच्या नात्यांत व गोत्यांत सांपडून शोक करणें, किंवा हे माझे आणि हे परके असे तुकडे पाडणें, अत्यंत गैर आहे. ब्रह्मांड एक सुंदर विणलेलें सणंग आहे. लहान मूल कात्री हातांत घेऊन सणंगाचे तुकडे करतें, त्याप्रमाणें देहाएवढी कात्री घेऊन ह्या विश्वात्म्याचे तुकडे करणें हा केवढा पोरकटपणा आणि केवढी हिंसा !

खरोखर फार खेदाची गोष्ट आहे कीं ज्या भरत-भूमींत ब्रह्म विद्या जन्मास आली, त्याच ह्या भूमींत लहानमोठ्या गटांचा आणि जातींचा नुसता बुजबुजाट दिसून येत आहे, आणि मरणाचा तर एवढा डर भरून राहिला आहे कीं तेवढा क्वचित् कोठें असेल. दीर्घकालीन पारतंत्र्याचा हा परिणाम आहे यांत शंका नाहीं. पण तो त्या पारतंत्र्याचें एक कारणहि आहे हें विसरून चालणार नाहीं.

मरण हा तर शब्दहि आम्हांला सहन होत नाहीं. मरणाचें नांव काढणें अभद्र वाटतें. " **क्षणा भर हा बोल न साहती । आणि मेलिया तरी रडती ॥** " असें ज्ञानदेवांना दुःखानें लिहावें लागलें आहे. कोणी मेलें तर काय तें रडणें आणि काय तें ओरडणें ! आम्हांला तें जणूं कर्तव्यच वाटतें. रडणारे मजुरीनें बोलावण्या-पर्यंत मजल आहे. मरण जवळ आलें तरी रोग्याला सांगणार नाहींत. डॉक्टरनें जरी सांगितलें कीं हा वांचत नाहीं तरी रोग्याला भ्रमांत राखतील. डॉक्टरहि स्पष्ट सांगा-वयाचा नाहीं आणि शेवटपर्यंत औषध घशांत ओतीत रहायचा. सत्य सांगून धीर देऊन ईश्वरस्मरणाकडे वळवतील तर किती उपकार होईल ! पण ह्यांना वाटती कीं धक्का लागून मडकें आधींच फुटलें तर ? पण फुटावयाच्या आधीं का मडकें फुटायचें होतें ? दोन तासांनीं फुटायचें तें थोडें आधीं फुटलें म्हणून तरी काय झालें ? ह्याचा अर्थ आपण कठोर आणि प्रेमशून्य व्हावें असा नाहीं. पण देहासक्ति हें प्रेम नव्हे, उलट देहासक्ति दूर सारल्याशिवाय खऱ्या प्रेमाचा उदयच होत नाहीं.

देहासक्ति जाईल तेव्हां हें सेवेचें साधन आहे ही गोष्ट कळेल आणि मग देहाला त्याची योग्य प्रतिष्ठाहि लाभेल. परंतु आज देहाची पूजा हें आपण साध्य मानून राहिलों आहों. स्वधर्माचरण हें साध्य आहे ही गोष्ट आपण विसरूनच गेलों आहों. स्वधर्मा-चरणासाठीं देहाला सांभाळलें पाहिजे, त्याला खायला प्यायला दिलें पाहिजे, परंतु

जिभेचे चोचले पुरविण्याची गरज नाहीं. पळी श्रीखंडांत बुडवा कीं पिठल्यांत बुडवा, तिला सुखदुःख नाहीं. तसें जिभेचें व्हायला पाहिजे. तिला रसज्ञान हवें, पण सुखदुःख नको. शरीराचें भाडें शरीराला देऊन टाकलें म्हणजे झालें. चरख्याकडून सूत कातवून घ्यायचें आहे म्हणून त्याला तेल द्यायला हवें. तसें शरीरापासून काम घ्यायचें म्हणून त्यांत कोळसा घालायचा. अशा रीतीनें देह वापरला म्हणजे तो मूळचा क्षुद्र असला तरी किंमतीला चढूं शकतो आणि त्याला प्रतिष्ठा लाभूं शकते.

पण देहाला साधन म्हणून न वापरतां आम्ही त्या देहांत बुडून आत्मसंकोच करून घेतों. त्यामुळें मूळचा क्षुद्र असलेला देह अधिकच क्षुद्र बनतो. म्हणून संत निकरानें सांगतात, " **देह आणि देह संबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानसूकरें ।** अरे, देहाची आणि देहाशीं ज्यांचा संबंध आला त्यांचीच नको तिन्ही त्रिकाळ पूजा करूं. इतरांना ओळखायला शीक. संत आम्हांला अशा रीतीनें व्यापक व्हावयास सांगत. आहेत. आम्ही आपल्या आप्तेष्टमित्रांशिवाय इतरांजवळ स्वतःचा आत्मा थोडा घेऊन जातों का ? " **जीव जीवांत घालावा, आत्मा आत्म्यांत मिसळावा** " असें आम्ही करतों का ? आमच्या आत्म-हंसाला ह्या पिंजऱ्याच्या बाहेरची हवा दाखवितों का ? माझ्या मानीव वर्तुळाला भेदून काल मीं दहा नवे मित्र केले, आज पंधरा झाले, उद्यां पन्नास होतील, आणि असें करीत करीत एक दिवस सर्व विश्वच माझें आणि मी सर्व विश्वाचा असा अनुभव घेईन, असें येतें का कधीं मनांत ? हे विचार मनांत नेहमीं आले पाहिजेत व तदनुरूप आचरण घडलें पाहिजे.


## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळे. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी—किंमत टपाल खर्चासह ( स्टँप—तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

**श्री साईलीला मासिक**

# मृत्यूचें भय नको

**********************

## ती आवश्यक अवस्था

मृत्यूसंबंधीं आपल्यामध्यें किती तरी वेगवेगळ्या कल्पना इष्ट व अनिष्ट रूढ
आहेत. तो वाटेल तेव्हां यावा व त्याचें आगमन अत्यंत सुखप्रद असें मानणारे फारच
थोडे; किंबहुना मुळींच नाहींत असें म्हटल्यास हरकत नाहीं. संसारांत मार्गक्रमण करीत
असतां हाल, अपेष्टा फार होत आहेत; धड खावयास, प्यावयास किंवा ल्यावयास
मिळत नाहीं; मागें मुलांचा अनेक गोष्टींविषयीं व कर्जदारांचा पैशाविषयीं एकसारखा
तगादा लागला आहे; आयापेक्षां खर्चाचें मान दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे,
अशा वेळीं एखाद्याची "देवा आतां मला मरण येईल तर बरें !" अशी इच्छा
झाली तर त्यांत मोठेंसें आश्चर्याचें कांहींच नाहीं. किंवा एखाद्यावर दुसऱ्यानें पूर्ण
विश्वास टाकून एकादी कामगिरी सोंपविली असतां त्यानें अप्रमाणिकपणा करून ती
कामगिरी न केल्यावर व उलट त्या दुसऱ्याला त्यानें लुबाडल्यावर, कांहीं काळानें
अनुताप पावून जर त्यास ह्या जीविताचा, संसाराचा व सर्व पाशांचा त्याग करावा
असें वाटलें, तर त्यांत आश्चर्य तें कशाचें ? अशा वर्तनाचा परिणाम वर दर्शविल्या-
प्रमाणें होणें हें कांहीं अंशी साहजिक आहे. परंतु संसार करीत असतां दुःख म्हणून
प्राप्त झालेलें नाहीं. सुखावांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं. कळूं लागल्यापासून आज-
पर्यंत जगिक सुखच सुख असा सर्व प्रकार आहे, तर अशी ज्याची स्थिति आहे,
त्याला आपणांस मृत्यु येईल तर बरें, असें कधीं तरी वाटेल काय ? आपला अनुभव
तरी निदान असा आहे कीं, आपण होऊन मृत्युची इच्छा कोणी करीत नाहीं. मृत्यु
हा खास येणार आहे, आपलें जीवित सांत आहे, कधीं तरी एकदां संसारांतील सर्व
सुखें, मुलेंमाणसें, धनवित्त ह्या सर्वांस येथेंच ठेवून आपणांस ह्या जगास मुकावें लाग-
णार असें जरी आपणांस चांगल्या रीतीनें माहित असतें तरी तो जितका लांबेल तितका
बरा, अशीच बहुतकरून प्रत्येकाची इच्छा असते. आणि ह्याचें कारण हेंच कीं,
मृत्युविषयींच्या आपल्या कल्पना फार भयंकर आहेत. सर्व दुःखांचा सांठा, सर्व यातनांचें
आदिस्थान व सर्व कष्टांचा उगम मृत्यु होय, अशा तऱ्हेचा समज आमच्या अंतः-
करणांत बिंबून गेलेला असल्यामुळें इतक्या सर्व त्रासास कारण होणारा जो मृत्यु तो
जितका लांबेल तितकें चांगलें असें वाटणें एकार्थी साहजिक आहे.

मृत्यु येणें हा ईश्वरी कोप आहे, अशी समजुत सर्वसाधारण आहे. ही समजूत
सर्वसाधारण असल्यामुळें संसारांत मार्गक्रमण करीत असतां जीं संकटें भोगावीं लाग-

तात तीहि ईश्वराच्या कोपाचींच चिन्हें, असें वाटत असतें. जसजसा मनुष्य ईश्वराकडे जास्त लक्ष लावण्याचा प्रयत्न करतो तसतशा त्याच्या ह्या कल्पना नष्ट होतात. हें जरी खरें आहे, तरी अनेक वेळां पुष्कळांस हा अनुभव असेल कीं, वरीलप्रमाणें मृत्युविषयींच्या कल्पना मानसिक यातनांस मात्र कारण होत असतात. वास्तविक पाहिलें तर प्रत्येकाच्या हें सहज लक्षांत येऊन चुकण्यासारखें आहे कीं आपलें जीवित सांत असावें, अशी ईश्वरेच्छाच दिसतें. दुसरें असें कीं, ह्या जगांत अनंतकालपर्यंत रहातां येतें अशी जरी कांहीं वेळ कल्पना केली तरीसुद्धां कांहीं वेळानें, धर्माकडे मनाची चांगली प्रवृत्ति असली तर, ह्या जगाचा कंटाळा आल्यावांचून राहणार नाहीं. जसजशी मनाची धर्माकडे जास्त प्रवृत्ति होत जाईल, आत्म्याचा मृत्युबरोबर नाश होणें शक्य नाहीं हा विश्वास जसजसा दृढावत् जाईल, तसतसे आपले विचार वर अवतरलेल्या अवतरणांत दर्शविल्याप्रमाणें बनण्याचा संभव आहे.

मृत्युविषयीं आणखी एक असा सर्वसाधारण समज कीं, तो जितका आकस्मिक असेल तितका चांगला. एखाद्या मनुष्याचा ठेंच लागून पडतांच अंत झाल्यास "बिचारा सुखी प्राणी!" असें कितीतरी लोक बोलत असतांना पुष्कळांनीं ऐकलें असेल. फार कशाला? ज्या ग्रंथिक सन्निपाताच्या सांथीला हजारों लोक बळी पडत आहेत ते सर्व लोक बरेच सुखी, त्यांना मरणाच्या वेळेच्या इतर दुखण्यांतील यातना तरी सहन कराव्या लागत नाहींत, असे अविचाराचे उद्गार कित्येक लोक काढीत असतात. कँटरबरीचे एक आर्चबिशप ह्यांचा देवळांत उपासना चालवीत असतां जेव्हां अंत झाला त्यावेळीं "आर्चबिशप साहेबांचा अळा तऱ्हेनें अंत झालेला पाहून त्यांच्या नातेवाइकांस फार दुःख झालें असेल; परंतु खुद्द आर्चबिशप साहेब किती सुखी!" असे उद्गार एका धर्मोपाध्यायानेंच काढले होते. सारांश, आकस्मिक मृत्यु हा सुखप्रद, ज्याला तो येतो तो भाग्यवान् अशी समजूत पुष्कळ ठिकाणी आहे. पण ही समजूत किती भ्रामक आहे? एखादा मनुष्य अंतकालच्या दुखण्यापर्यंत सचोटीनें वागत असतां अखेरीस कांहीं काळपर्यंत त्यास यातना सहन करावयास लागल्या म्हणून तो पापी व सर्व आयुष्यभर सरळ मार्गाचें अवलंबन न करितां, अनीतीचें अवलंबन करणारा केवळ आकस्मिक मृत्यु आला म्हणून सुखी व पुण्यवान्, अशी मनाची समजूत होऊं देणें चुकीचें आहे. केवळ अंतकाळच्या क्षणिक स्थितीवर आपल्या आत्म्याचें कल्याण अगर अकल्याण अवलंबून असतें असें समजणें म्हणजे तसें करणारानें आपलें डोकें ठिकाणावर नाहीं असें कबूल करण्यासारखें आहे. ज्यानें अंतकाळपर्यंत आपल्या आयुष्याचे सर्व दिवस सचोटीनें काढीलें आहेत, परोपकारासारखे पुण्य नाहीं हें मनांत पक्कें बिंबवून घेऊन ज्यानें आपल्या आयुष्यांतील बराचसा भाग परोपकारकार्यीं खर्चिला आहे, नीतिपथापासून पराङ्मुख होऊन अनीतीकडे धांवणाऱ्यास सत्पथीं नेण्यास ज्यानें अहर्निश प्रयत्न

केले आहेत; सत्य व धर्म ह्यांस विहित अशा आचरणावांचून दुसऱ्या कोणत्याहि सन्हेचें आचरण ज्यानें कधींहि केलें नाहीं, अशा पुरुषाचा अंत आकस्मिक रीतीनें झाला काय, किंवा पुष्कळ यातना सोसून झाला काय, त्यामुळें त्याच्या थोरपणांत व्यत्यय येतो काय ? उलट यातना सहन करीत असतांना अनुभवास येणारी शांति त्याच्या एकंदर जीवनाचें श्रेष्ठत्व दाखवून देतें; म्हणून सांगावयाची मुख्य गोष्ट ही कीं मृत्युसंबंधाच्या अशा प्रकारच्या वावग्या कल्पना आपण दूर करण्यास शिकलें पाहिजे. अंत कसाहि होईना बापडा, आपल्या आत्म्याचें कल्याण हे आपल्या नित्याच्या शीलावर व आचरणावर अवलंबून आहे, ज्याचें शील व आचरण निर्दोष, त्यास उत्तमावस्थाच प्राप्त होणार असा आपला विश्वास असावा. हा विश्वासच मृत्युसंबंधानें भलभलत्या कल्पनांचें वर्चस्व कमी करूं शकणार आहे. प्राणीमात्रास मृत्यु ही एक अवश्य स्थिति आहे, अशी आपण आपल्या मनाची खात्री पटवून घेणें हीच मोठ धर्माकडे आपलें लक्ष अधिक प्रमाणानें लावण्यास कारण होते.

## —उभी तुझ्या मंदिरांत—

आसुयेची धरूनी कांस
उभी तुझ्या मंदिरांत ।
भावनेच्या तबकांत
भक्तिचें तें निरांजन
जीवनाच्या ज्योतिनें मी
ओवाळीते साईनाथ ॥ १ ॥
प्रीतिचा तो भरूनी चौक
हृदयाचा मांडुनि पाट
करूनी असा थाटमाट
भरवीते साईनाथ ॥ २ ॥
आसवांची गुंफुनी माळा
शोभविते साई गळां
दीन दासी भजनां यातां
साई चरणीं जोडी हात ॥ ३ ॥

—गोविंद केशव पेठकर

# ध्येयपालनाची तीव्र आवश्यकता

**********************************

भगवद्भक्त रामदास ह्यांच्या नरदेहाच्या आरंभीं धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पहा हो । जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें । ही सुप्रसिद्ध ओंवीं आहे. मानवी जीवित अत्यंत अपूर्व आहे. कोणत्याहि दृष्टीनें त्याचा विचार केला असता त्याची अपूर्वता आपल्या नजरेस येते. बुद्धीच्या दृष्टीनें त्याची बरोबरी करणारें दुसरें कोणतेंहि जीवन नाही. मनुष्याच्या मनाची शक्ति इतकी मोठी आहे कीं तिच्या जोरावर आपणाला कल्पनातीत अशी कार्ये तो करीत असतो. त्याचें शरीरबल कांहीं प्राण्यांच्या मानानें कमी आहे हें खरें, तरी योग्य काळजी घेतली असतां व खाण्यापिण्याची, व्यायामाची योग्य व्यवस्था ठेविली असतां त्या बाबतीत सुद्धां तो शक्तिमान् प्राण्यांना हार जाण्यास भाग पाडतो. नैतिक दृष्ट्या मनुष्याची बरोबरी कोणालाही होणें शक्य नाही त्याच्या ठिकाणीं सत्याविषयीं असणार प्रेम, सत्य वर्तनाची हौस, सत्याचाच नेहमीं जय होतो ह्याविषयीं दृढ विश्वास, स्वतः तो खोटें बोलणारा असला तरी इतरांनीं सत्य बोलावें ही त्याची अपेक्षा, ही सर्व गुणांचें त्याच्या ठिकाणचें प्रेम व जाणीव व्यक्त करीतात.

मनुष्याची ज्ञानलालसा विलक्षण आहे. थंडी, वारा, ऊन, पाऊस इत्यादिकांना न जुमानतां, उत्तर व दक्षिण ध्रुव शोधून काढण्यासाठीं मनुष्यानीं आजपर्यंत केलेलें विलक्षण धाडस, आकाशयानें पूर्णतेला नेण्यासाठीं मनुष्यांचे खर्ची पडलेले प्राण, हिमालयाच्या शिखरावर आरोहण करण्यासाठीं तो करीत असलेले प्रयत्न, त्याच्या ज्ञानाची लालसा उत्तम प्रकारें व्यक्त करीतात. त्याचप्रमाणें शुद्ध व उज्ज्वल आचरण ठेवणें, इतरांच्या सेवेला तत्पर असणें, स्वार्थत्याग करणें, व ईश्वरभक्ति ह्या बाबतींत मनुष्याचा हात धरण्यास किंवा त्याची बरोबरी करण्यास कोणता दुसरा प्राणी समर्थ आहे ? एका भक्तानें म्हटल्याप्रमाणें "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" ही उक्ति अगदीं खरी आहे. इतका हा महत्वाचा, विलक्षण शक्यतेनें भरलेला नरदेह, परमेश्वरानें आपल्याला कशासाठीं दिलेला आहे हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. कारण ह्याच्या योग्य कल्पनेवर आमचा सर्व वर्तनक्रम किंवा जीवितसरणी अवलंबून असणार हें अगदीं उघड आहे ! मनुष्याला ध्येयाची जाणीव असेल तरच तो त्याच्या साधनासाठीं प्रयत्न करील, नाही तर वारा वाहील त्याप्रमाणें हेलकावे खाणाऱ्या गलबताप्रमाणे त्याची स्थिति होईल. आमच्या जीविताचे उद्दिष्ट काय ? तें आपल्याला सहजासहजीं प्राप्त झालें आहे कीं कसें कीं त्याचा मार्गे पुढें कशाशीं संबंध आहे ? खाणें, पिणें, मजा करणें हा त्याचा हेतु कीं त्यापेक्षां कांहीं श्रेष्ठ हेतु त्याच्या ठिकाणीं आहे ? याचा प्रत्येकानें विचार करून आपल्या ध्येयावर सदैव दृष्टी ठेऊन त्याचें पालन करण्यासाठीं अहर्निश झटलें पाहिजे.

# भक्तीचें महात्म्य

*******************

## " माझे भक्त आठवण करतात तेथें मी असतों "

कोणे एके काळीं रामेश्वरीं शिवरात्रीची यात्रा भरली असतां त्या ठिकाणी उत्तर देशाहून दोन ब्राह्मण आले. ते दोघे तीर्थवासी पवित्र व देवभक्त असून नेहमी हरिभजनांत दंग असत. त्यापैकीं एकजण हरिद्वारचा राहणारा असून त्याचें नांव कल्याण असें होतें. त्याचें सर्व कुटुंब हरिद्वारासच राहत असे.

दुसऱ्याचें नांव ब्रह्मचारी असेंच असून गौडदेश ही त्याची जन्मभूमिका होती. त्याच्या आईबापाचा कांहींएक पत्ता नसल्यानें तो परमेश्वरासच आपलें सर्व गोत समजत असे. त्या दोघांची गांठ पडून मोठा स्नेह जमला. दोघांनाही परस्परांच्या सहवासांत सुख वाटूं लागलें. दोघांना आत्मानात्म विचाराची गोडी असल्यामुळें ते एकत्रच यात्रा करीत राहिले. तीर्थाटण करितां करितां ते दोघे मथुरेस येऊन दाखल झाले.

त्या ठिकाणी तीन रात्र मुक्काम झाल्यानंतर कल्याणास हींव लागलें. मथुरेसारख्या पुण्य क्षेत्रांत वास केला तरीही शरीरभोग कोठेंही व कोणालाही सोडीत नाहींत. चंद्रासारख्या अमृत स्रवणाऱ्यांनाही क्षयरोग लागला मग मर्त्य जगताची ती कथा काय! असें मनांत आणून तो कल्याण ब्राह्मण आपल्या पूर्वकर्माचें दुष्ट फळ भोगीत पडला.

आपल्या बरोबरचा सवंगडी आजारी पडलेला पाहून तो ब्रह्मचारी त्याला सोडून गेला नाहीं. तो नुसता पोटभरू व ढोंगी यात्रेकरू नव्हता. आपला धंदा या नात्यानें किंवा चैनीनें तो यात्रा करीत नव्हता. तो खरा संत होता. तो सत्यवादी, परोपकारी असून त्याच्या अंतःकरणांत मूर्तिमंत भूतदया वास करीत होती. त्यानें सहा महिनेपर्यंत कल्याणाची उत्तम सेवा केली. त्याला औषध देणें, त्याचें पथ्यपाणी सांभाळणें वगैरे गोष्टींची त्यानें अगदीं हयगय होऊं दिली नाहीं. सहा महिन्यानंतर परमेश्वरी कृपेनें कल्याणाचें दुखणें बरें झालें.

ब्रह्मचाऱ्याच्या सेवाचाकरीनें कल्याण फार संतुष्ट झाला. त्याची कृतज्ञताबुद्धि त्याला वरचेवर टोचूं लागली. आपल्याला पुत्र, कन्या, कांता ही असून त्यांचा संकटांत कांहींएक उपयोग न होता परदेशामध्यें संकटसमयीं ब्रह्मचारीच आपल्या कामीं आला असें वाटून त्याचें त्या ब्रह्मचाऱ्यावर अत्यंत प्रेम जडलें. त्याला आपला जांवई करून त्याच्या उपकाराची फेड करावी असें कल्याणानें योजिलें. त्याची कन्या त्यावेळीं आठवर्षांची होती. ती त्याला देण्याविषयींचा आपला मानस त्यानें ब्रह्मचाऱ्यास कळ-

विला. ब्रह्मचारी प्रथमतः त्या गोष्टीस कबूल होईना. कल्याणानें बहुत आग्रह धरला तेव्हां तो ब्रह्मचारी बोलला "मी मातापितारहित असून कंगाल आहे. आपल्या कुटुंबास मी पसंत पडणार नाहीं. आपली माझी वचनभाक झाली आणि आपल्या घरच्या मंडळींच्या नापसंतीनें माझा विवाह आयत्यावेळीं मोडला तर धड ब्रह्मचार्य नाहीं आणि गृहस्थाश्रमही नाहीं असें होऊन माझी दैना उडेल."

ब्रह्मचाऱ्याच्या या भाषणानें कल्याणाचा निर्धार जास्तच ठाम झाला. तो त्या ब्रह्मचाऱ्यास घेऊन महाद्वारांत गेला आणि श्रीकृष्णास साक्ष ठेवून त्यानें ब्रह्मचाऱ्याच्या हातावर कन्यादानाचें उदक सोडिलें.

नंतर तीनवार मार्गक्रमण करून ते दोघे हरिद्वारास पोंचले. यात्रेहून कल्याण कोरडा ठणठणीत परत आलेला पाहून सुखाचे सांगाती असलेले सर्व आप्तगण त्याच्याशीं प्रिय भाषण करीनात. त्याच्याबरोबरचा ब्रह्मचारी पाहून त्याच्या बायकोनें त्याची विचारपूस केली. त्यानें ब्रह्मचाऱ्याचें सर्व वर्तमान बायकोस सांगितलें. ब्रह्मचाऱ्यासारख्या सज्जनाच्या कृपेनें आपला नवरा आजारांतून बरा झाला याबद्दल त्या बाईला किती तरी प्रेमा वाटावयास पाहिजे होता; पण कल्याण दरिद्री असल्यानें ती बाई म्हणाली "यात्रा करीत असतां पुण्यक्षेत्रामध्यें मरण येण्याइतकें पुण्य तुमच्या पदरीं आहे कोठें!"


कल्याणाच्या बायकोचें हें वाक्य ब्रम्हचाऱ्यानें द्वारांतून ऐकिलें. तो त्यासंबंधीं कांहीं बोलणार तों कल्याणानें आपल्या बायकोस कन्येच्या विवाहसंकल्पाची हकीगत सांगितली. ब्रम्हचाऱ्यासारख्या दरिद्यास कन्या देण्याची भाषा ऐकतांच ती बाई मोठ्या ठणक्यानें बोलली "तुम्हाला त्या भिकारड्याचे उपकार फेडायचे असतील तर तुम्ही दुसरें लग्न करा आणि तिच्या पोटीं होईल ती मुलगी त्याला देऊन वचनमुक्त व्हा. मी आपली कन्या विहिरींत लोटीन किंवा तिला तशीच बेगम राखीन; पण असल्या घरनादार हरिभजकाला मी आपली मुलगी कधींही देऊं देणार नाहीं."

बायकोचा हा ताशेरा ऐकून कल्याणानें आपल्या पुत्रास अनुकूल करून घेण्याचे योजिलें. तोही विरुद्धच आहे असें पाहतांच तो कल्याण ब्राह्मण चिंतातुर झाला. कांता आणि पुत्र यांच्यापुढें नाइलाज होऊन तो कल्याण लागलाच राजाकडे जाऊन आपलें वृत्त सांगू लागला. राजानें आपल्या बायकोला व पुत्राला धाक घालून आपल्याला वचनमुक्त करवावें अशी त्यानें राजाची विनवणी केली. त्या राजाला कल्याणाचें वचनच खरें वाटेना. कल्याणाचें डोकें ठिकाणावर नाहीं. असें कल्पून त्याची कशीतरी समजूत करण्याच्या बुद्धीनें राजा म्हणाला "या तुमच्या करारास कोणी साक्षीदार आहे का?" राजाच्या या प्रश्नास ब्रह्मचाऱ्यानें उत्तर दिलें.

" आमच्या या ठरावास मथुरावासी श्रीकृष्णाखेरीज कोणीही साक्षीदार नाहीं. त्या पुराणपुरुषास साक्ष ठेवून आमचा हा व्यवहार झाला आहे.

त्याच्या या सात्विकी बोलण्यावर त्या सूज्ञ राजानें सांगितलें कीं, " मग तुमचा तो पुराणपुरुष साक्षीस आला तर मी तुमचें कार्य करीन. ",

राजानें हे भाषण कोणत्याही मतलबानें केलेलें असो. आपल्या स्वतःच्या भोळ्याभावानुसार तो ब्रह्मचारी साक्षीदार घेऊन येण्याकरितां मथुरेस गेला. त्यानें आपल्या भक्तिसामर्थ्यानें श्रीकृष्णास चालावयास लावून तो दगडाचा देव आणि हाडामासांचा भक्त असे दोघे हरिद्वाराकडे निघाले. वाटेनें चालत असतां श्रीकृष्ण मागें चालत होते. ब्रह्मचाऱ्यानें मागें पाहिलें तर आपण तेथेंच मुक्काम करूं अशी देवाची अट होती. जेथून हरिद्वार अर्धा कोस दूर आहे अशा ठिकाणीं ब्रह्मचाऱ्यानें चुकून मागें पाहिले; तेव्हां ठरल्याप्रमाणें देवाची मूर्ति तेथेंच थांबली. तें पाहतांच राजालाच त्या ठिकाणीं आणण्याकरितां ब्रह्मचारी राजसभेंत गेला. अंबरीषाच्या कैवारानें ज्याने दुर्वासाचीही प्रतिष्ठा राखली नाहीं तो भक्तकवारी साक्ष देण्याकरितां आपण आणिला आहे, असे ब्रह्मचाऱ्याचे भाषण ऐकतांच राजाला परम आश्चर्य वाटलें. तो आपल्या सभासदांसह लोटांगणें घालीतच त्या स्थळीं गेला. त्याठिकाणीं मथुरेंतील चतुर्भुज मूर्ति पाहून राजा सद्गादित झाला. लक्ष्मीपती सत्काराकरितां तेथें अनेक विद्वान प्राप्त झाले. राजानें आपल्या पदरचा खर्च करून ब्रह्मचाऱ्याचें व कल्याणाच्या कन्येचे लग्न लावून दिलें. लग्नसोहळा होऊन सर्व पाहुणे घरोघरी गेलें. साक्षीकरितां प्राप्त झालेली प्रभूची मूर्ति पुढें तेथेंच कायमची राहिली. मथुरेमध्यें नवीन मूर्ति स्थापण्यांत आली. अशाप्रकारच्या भक्त-महात्म्यानें स्थापित झालेली ती हरिद्वार मूर्ति उत्तरदेशामध्यें भक्तागमनाची वाट पाहत अद्याप उभी आहे.



# भगवद्भक्त सूरदास

श्रीकृष्ण आणि सत्यभामा यांच्यामध्यें कांहीं कारणावरून रुसवारुसव होऊन कृष्णानें सत्यभामेचें मंदिर कांही काल वर्ज केले. आपल्या मंदिरांत नेहमींप्रमाणें आपला भ्रतार येत नाहीं या दुःखानें भामा व्याकुळ झाली. तिला पतिवियोग सहन होईना. कृष्णाची समजूत कशी करावी या विचारानें भामा चिंताक्रांत होऊन बसली असतां त्या ठिकाणीं अकस्मात् अक्रूराचें आगमन झालें. आपला पति अक्रूराच्या आधीन आहे असें जाणून तिनें अक्रूराला मध्यस्ती करण्याविषयीं प्रार्थना केली. तिच्या मनांत त्यावेळीं पतिदर्शनाची इतकी प्रबळ इच्छा उद्भवली कीं, ती कृष्णपत्नी वियोगपावकानें विव्हल होऊन बेशुद्ध होऊन पडली. तिच्या दृष्टीस श्रीकृष्ण न पडेल तर ती तेथेंच प्राण सोडील असें जाणून अक्रूरानें स्वतःच कृष्णाचें रूप धारण केलें आणि तो भामेला सावध करूं लागला. इतक्यांत त्या मंदिरांत साक्षात् श्रीकृष्ण प्राप्त झाला. आपल्या अपरोक्ष आपल्या एकांत शयन-गृहांत अक्रूरानें आपलें रूप धारण केलें आहे असें पाहतांच श्रीकृष्णानें शापवाणीचा उच्चार केला कीं,

" अक्रूरा; तूं हा कपटवेश धारण करून सत्यभामेच्या मंदिरांत वास्तव्य केलेंस याकरितां तूं कलियुगीं मृत्युलोकीं अंधाचा जन्म घेशील आणि ही सत्यभामा दासीचा जन्म घेईल. "

या शापास अनुसरून अक्रूरानें मथुरादेशांत सूरदासाचा अवतार धारण केला. तो जन्मांध होता. तो पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट असल्यानें सर्व काळ हरिचिंतनांत निमग्न असे. तो गवई व कीर्तनकार असून गीत गाऊन परमेश्वराला आळवीत असे. रोज कांहींतरी कवित्व करावें असा त्याचा नित्यनेम असे.

एकदा मथुरेची यात्रा जमली त्यासमयीं सूरदासाला कृष्णमूर्तीच्या दर्शनाची इच्छा उत्पन्न झाली. तो टेकत टेकत महाद्वारांत गेला. त्यानें तेथेंच देवाला लोटांगण घातलें आणि हात जोडून तो म्हणाला " परमेश्वरा; मला शाप देऊन जन्मांध का केलेंस ! कृष्णावतारीं मी तुला कंसासुराकडे घेऊन जाण्यास गोकुळांत आलो, तेव्हां माझ्या आगमनानें यशोदा, गोप, गोपी, यांना बहुत कष्ट झाले. मी तुला मथुरेस घेऊन गेलों त्यामुळें यशोदा विरहानें भाजून निघाली. त्यांच्या तळतळाटाच्या पातकामुळेंच तूं मजवर क्रुद्ध होऊन मला शाप दिलास काय ! गोकुळामध्यें माझ्याकडून अपराध घडला खरा; पण सत्यभामेच्या मंदिरांत मी तुझें रूप घेतलें त्यांत मात्र माझा हेतु शुद्ध

होता हें तुला समजूं नये काय ? मग तूं मला शापानें कां जाळलेंस ? आतां मी तुझें रूप पहावें कसें ? तुझें ध्यान करण्याकरितां मी कोणती प्रतिमा पुढें आणावी बरें ? ”

अशी शुद्ध विनंति करून सूरदास रडूं लागला. त्याचें ते प्रेमाश्रु पाहून श्रीकृष्णाच्या कृपेनें सूरदासाचे डोळे परत आले. त्यानें आपल्या दृष्टीनें परमात्म्याची गोजिरवाणी मूर्ति निरखून पाहिली.

परमेश्वराचें स्वरूप चांगलें ध्यानांत राखून तो पुन्हा हात जोडून म्हणाला “ देवाधिदेवा; तुझ्या प्रत्यक्ष दर्शनानें मी कृतार्थ झालों. मी आजपर्यंत कोणताहि विषयपदार्थ दृष्टीनें पाहिलेला नाहीं. मला तूं दृष्टी दिली आहेस हिच्या योगानें मी विषयमोहांत पडून स्वहिताला मुकण्याचा संभव आहे, म्हणून मला ही दृष्टी नको. दृष्टीचें खरें कार्य जें परमात्मदर्शन तें पार पडलें आहे. मी तुझें रूप हृदयांत साठवून ठेविलें आहे. आतां मला हे नेत्र नकोत ! ”

सूरदासाच्या या भाषणानें देवाला हंसें आलें. नंतर सूरदासाचे नेत्र पूर्वीप्रमाणें होऊन तो आपल्या घरीं गेला आणि प्रत्यक्ष पाहिलेलें हरिरूप ध्यानांत आणून ध्यानयोग करीत राहिला.

याच सुमारास अवंती नगरांत एक पुण्यशील राजा राज्य चालवीत होता. त्याच्या पदरीं पांचशें उत्तम गवई होते. त्या सर्वांत तानसेन या नांवाचा गवई प्रमुख होता. तो गानविद्येंत इतका प्रवीण होता कीं, त्याच्या रागरागानें दिवे देखील आपल्या आपण पेटत असत. तो तानसेन खरा मर्मज्ञ असल्यानें तो स्वतः निरभिमानी होता. त्याच्या मनाची परीक्षा करण्याकरितां त्या चाणक्ष राजानें एक दिवस तानसेनाची स्तुति केली कीं, “ तानसेना, तुझ्यासारखा गवई सारी पृथ्वी धुंडाळली तरी सांपडणार नाहीं. तूं सर्वश्रेष्ठ गवई आहेस. तुझ्याहून वरचढ कोणीही नाहीं. ”

राजाच्या या भाषणावर तानसेन नम्रतेनें बोलला “ सरकारांनीं असें अविचाराचें भाषण करणें प्रशस्त नाहीं. जगतामध्यें शेरास सव्वाशेर असावयाचेच. ब्रह्मदेवाला आपल्या सृष्टिरचनेचा गर्व होतांच ईश्वरानें विश्वामित्राकरवी त्याचा गर्व हरण केला. समुद्राला आपल्या व्यापकतेचा गर्व होतांच आगस्तीच्या हस्तें समुद्राचें आचमन झालें. नारदाला आपल्या गाण्याचा अभिमान उत्पन्न होतांच श्रीकृष्णानें यःकश्चित् अस्वलाकडून त्याचा पाडाव केला. याकरितां कोणीही आपल्या ज्ञानाचा अभिमान वाहूं नये.

तानसेनाची लीनता पाहून राजाला संतोष वाटला! त्यानें पुनः त्यास विचारिलें- “ आपलें म्हणणें यथार्थ असेल; पण हल्लीं तुम्हांपेक्षां वरचढ असा कोणी गवई हयात असल्याचें तुमच्या ऐकिवांत आहे का ? ” या प्रश्नास तानसेनानें उत्तर दिलें. “ मथुरेमध्यें सूरदास या नांवाचा एक आंधळा भगवद्भक्त आहे. तो अक्रूराचा अवतार आहे. ” असे सांगून तानसेनाने रेतीची एक ओंजळ भरून घेतली आणि ती राजापुढें टाकून तो पुन्हां म्हणाला “ त्या सूरदासाला इतक्या रागरागिण्या पाठ आहेत. ”

तानसेनाच्या सांगण्यावरून राजानें सूरदासाला अवंतीस आणिलें. राजानें त्याचा योग्य सन्मान करून त्याला कीर्तन करण्याची विनंति केली. हरिलीला गाण्याकरितांच भूलोकावर जन्म धारण करणाऱ्या सूरदासास कीर्तनाची विनंति अमान्य होणें संभवनीयच नव्हतें. त्यानें लागलीच आपला वीणा जुळवला आणि हरिलीलांचें गायन सुरू केलें. सूरदासासारख्या भक्तांच्या मुखांतून ईशकीर्तनाचा उच्चार होऊं लागतांच गणपती टाळ्या वाजवूं लागला, सरस्वती सूरभरणा करूं लागली. रंभा-मेनकादि अप्सरा आणि गंधर्व तटस्थ झाले. प्रत्यक्ष परमात्मा लक्ष्मीपती त्याच्या कीर्तनांत नृत्य करूं लागले. त्या दिव्य कीर्तनानें राजा फार आनंदित झाला. त्याला सूरदासाचा श्रेष्ठ अधिकार समजून आला. सूरदासाचें एक महिना कीर्तन होऊन त्याच्या उपदेशानें सर्व शहरवासी बायकापुरुष भजन करूं लागले.

सूरदासाचें कीर्तन राजस्त्रियांना ऐकावयास सांपडलें नव्हतें. त्या गोषांतील स्त्रिया होत्या त्यांना सूरदास हा अंध आहे असें कळल्यावरून त्यांनीं राजाजवळ विनंति करून अंतःपुरामध्यें स्त्रियाकरितां सूरदासाचें कीर्तन करण्याचें ठरविलें.

त्या राजाच्या जनानखान्यांत त्याच्या स्वतःच्या पांचशें स्त्रीया होत्या. खेरीज नाटकशाळा त्या वेगळ्याच. सर्व राजांगनानीं आंधळ्या सूरदासाची यथोपचार पूजा केली. आणि कीर्तनास प्रारंभ झाला. त्याचें गायन ऐकतांच सर्व स्त्रिया तल्लीन झाल्या. श्रीकृष्णाच्या शापाप्रमाणें सत्यभामेच्या अंशरूपानें अवतीर्ण झालेली दासीही याच राजाच्या दासीजनांत वास्तव्य करीत होती. ती त्याठिकाणीं तत्परतेनें धावून आली. ती सूरदासाच्या आलापानीं हरिणाप्रमाणें लुब्ध होऊन देहभान विसरली. मनाच्या निर्मान स्थितींत असल्यानें तिला कांहीं दिसेनासें झालें. तिच्या व सूरदासाच्यामध्यें एक कारंजाचा हौद होता. त्याच्यावरूनच ती सूरदासाकडे जाऊं लागली. सूरदासास पुन्हा दृष्टि प्राप्त होऊन त्याला ही दासीची तल्लीनता दिसली. ती हौदांत पडेल असें जाणून तो बोलला " इतकी घाई का ? पुढें हौद भरलेला आहे तो दिसत नाहीं का ? " सूरदासाच्या या सूचनेवरून तो आंधळा नाहीं अशी राजस्त्रियांची सहजच समजूत झाली. कधींही परपुरुषाच्या दृष्टीस न पडणाऱ्या त्या सर्व राजस्त्रिया लागलींच पडद्यामागें जाऊन लपून बसल्या. तो एकांत पाहतांच त्याठिकाणीं श्रीकृष्ण परमात्मा प्रगट झाले आणि त्यांनीं ती दासी आणि सूरदास यांना आपल्या स्वरुपीं मिळवून टाकिलें.

# चंदनापरी

चंदनापरी हा देह झिजवीन ।
भक्त साईनाथा तुझा म्हणवीन ॥ ध्रु ॥
घालीन लोटांगण, अंगे झाडीन अंगण ।
नाम तुझे वाचे, नित्य मी गाईन ॥ १ ॥
अमृताच्या धारा, वर्षताती दारा ।
काय उणे देवा भक्ता या पामरा ॥ २ ॥
वंदी स्वर्ग, धरा, तुज शिरडीश्वरा ।
तुम्ही मायबाप, संसारी या तारा ॥ ३ ॥
तूच रे विसावा, मुकुंदा यादवा ।
जन्मजन्मांतरी, घडो तुझी सेवा ॥ ४ ॥
तुझी आठवण, कुबेराचे धन ।
मुक्ति झाली लीन, नाचे ब्रह्मपदी मन ॥ ५ ॥

# साईकृपा

साईगुणगान हे माझे जीवन ।
साईकृपा हेचि थोर मोक्षधन ॥ १ ॥
प्रपंचाचें ओझे जरी असे पाठी ।
जगावे जळावे नित्य साईसाठी ॥ २ ॥
असावे उदास मनाने उदार ।
विसंबून राही सदा बाबावर ॥ ३ ॥
श्रद्धेच्या बळाने तसे निश्चयाने ।
लाभेल तुला रे सुखाचे चांदणे ॥ ४ ॥
विश्वाचा आधार शिरडीश्वर ।
नाम त्याचे घेता होते भवदुःख दूर ॥ ५ ॥
योगियांचा राणा भक्तिचा भुकेला ।
मुखे आतां सारे साई, साई बोला ॥ ६ ॥

--बा. भा. मगदूम

# तस्मात् युद्धाय युद्धस्व

**************●**************

—लेखक बा. भा. मगदूम.

आपपरभावांतून निर्माण झालेल्या संशयरुपी धुक्यांतून सत्यरुपी सूर्यप्रकाशाकडे अर्जुनास खेचून नेण्यासाठीं भगवान श्रीकृष्णानीं हा उपदेश पार्थाला केला. जन्म-मृत्यूची जाचक बंधने तोडण्यासाठीं तूं युद्धाला तयार हो, त्याशिवाय हीं दोन टोकें तुला सांधतां येणार नाहींत. आणि जर तूं स्वस्थ बसलास तर हीं बंधने अधिकच तुला गुरफटून टाकतील व तुला आत्मनाशाच्या भीषण संकटाप्रत नेतील. यासाठीं हीं सर्व भौतिक नाती 'इदं न मम् । इदं सर्वम् । अशा स्वरुपाची आहेत. हाच संदेश 'श्रीसाईबाबांनीं आपल्या श्रद्धा व सबुरी, या मतांनीं दिला आहे. श्रद्धा म्हणजे सावधानता, व सबुरी म्हणजे भक्ति, संसार म्हणजे सावधपणाने व निश्चयानें केलेली वाटचाल आहे व या प्रवासाचें शेवटचें मुक्कामाचे स्थान भक्ति हें आहे. हा संदेश बाबानीं या दोन शब्दाद्वारें दिला आहे.


संसाराचें ओझें हताश न होतां अलीसपणें कसें वहावें, हाच या उपदेशाचा अर्थ आहे. यांतील इदं न मम् । म्हणजे हा मानवी देह । कृपणाचें धन आहे यावर आत्मस्वरुपाचा कांहीं अधिकार नाहीं. आणि इदंसर्वम् । म्हणजे हें सर्व भौतिक ऐश्वर्य तुला परमेश्वराच्या कृपेनेच मिळालें आहे. असा असावा. जीवनाचा हेतू शुद्ध असतांना जर त्याच्यावर संकटांची छाया असेल तर ती दूर करण्यासाठीं कर्तव्यकठोर होणें, त्याज्य नसून विहित आहे व त्यासाठीं जीवनाची लढाई, श्रद्धेनें लढली पाहिजे यशापयशाची पर्वा न करतां केवळ संकटांचा परिहार करण्यासाठीं ' युद्ध हें केलेंच पाहिजे, हा निष्कर्ष यांतून निघतो व तो सदासर्वदा ग्राह्यच आहे.

" श्रद्धा म्हणजे फलाची आशा न धरतां केलेले निष्काम कर्म होय, पण केवळ कर्तव्यानें बंधमुक्त होतां येत नाहीं. अंतीम परिणामाची बाकी शिल्लक रहाते यासाठीं श्रद्धेला, सबुरीची जोड बाबांनीं दिली.

व्यवहारांत ज्याप्रमाणें कोर्टाच्या निकालाला, ज्यूरीच्या निर्णयाची मदत घ्यावी लागते, तद्वत श्रद्धा, व सबुरीशिवाय या जीवन योगाला पूर्णता येणार नाहीं. जीवनांत पदोपदीं माणसाला अनर्थाशीं व अन्यायाशीं झगडावें लागतें. हा लढा अटळ असतो. पृथ्वीच्या पाठावरील प्रत्येक सजीव प्राण्याला हा संग्राम करावाच लागतो. ही जन्म-गती आहे. कांहीं याला कर्मगति म्हणतात. शिवाय कालगतीची यांत भर पडली आहे.


ज्योतिनें स्वत: जळल्या शिवाय प्रकाशदानाचें पुण्य तिला मिळणार नाहीं, हे अपरिहार्य आहे.

‘ आज्ञा, कर्म, म्हणजे श्रद्धा, व प्रकाश कर्म म्हणजे सबूरी, आज्ञा कर्मांनें दुर्गुणांचा नाश करावा. व प्रकाश कर्मांने आत्मोद्धार साधवा असा या संदेशाचा व्यापक अर्थ असावा. ‘ श्रद्धा व सबुरी या दोन पायांनीं माणसानें जीवनाची वाटचाल करावी या उद्देशानें बाबानीं हा सोपा व महत्वाचा उपदेश जगाला केला. या उपदेशाचें पालन आपण जितक्या योग्य प्रकारें करूं तितकें आपलें जीवन यशस्वी, निरामय, व निष्कटंक होईल. याची खात्री प्रत्येकाला स्वानुभूतीनें घेतां येईल, जीवनांतील जमाखर्चाच्या या दोन बाजू बाबानीं आपणाला दाखवून दिल्या आहेत; व हा जमाखर्च योग्य रीतीनें लिहिण्याची सद्बुद्धि आम्हांला लाभो, हीच बाबांच्या चरणीं प्रार्थना.



दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन** (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

**छबिलदास रोड, दादर (W. R.),**

# महामुनी वसिष्ठ

*******************

रामायणकाळीं ब्राह्मणांचे अग्रणांत्ने अग्रणी वसिष्ठ होते. त्यांच्या चरित्राचा आवण विचार करूं या रामायणांत ते राजगुरु म्हणून आलेले आहेत. त्यांचा धार्मिक आणि आध्यात्मिक शास्त्रांत अधिकार होतांच, शिवाय निर्विकल्प समाधीविषयीं दोन शब्द सांगूं शकतील अशी त्यांची योग्यता होतीच. अर्थात् आध्यात्मिकता, धार्मिकता आणि निर्विकल्प समाधि यांविषयीं वसिष्ठ प्रमाणभूत होते, इतकेंच नव्हे तर ते राजनीति आणि अर्थशास्त्र यांतहि प्रमाण म्हणून मानले जात असत. त्यांनीं स्वतःचे कर्तृत्व, चारित्र्य, आणि सामर्थ्य यांमुळें असा प्रभाव म्हणून निर्माण केला होता की, जें इक्ष्वाकु कुल कोणापुढेंही नमणार नाहीं त्या इक्ष्वाकु कुळांतली राजगादी सुशोभित करणारे आणि त्यांचे मंत्री चौवीस तास त्यांच्यासमोरं नतमस्तक होऊन उभे असत. वसिष्ठ वैदिक वाङ्मयाचा घरोघरीं प्रचार करण्यांत अग्रणी होते. मानवी जीवनाचे संशोधक म्हणुन आजसुद्धां मानव जात त्यांच्यासमोर नम्र होईल. शास्त्रीय वाङ्मयांतील पुष्कळ ग्रंथ त्यांनीं लिहिलें आहेत.

मिताक्षरादि ग्रंथांत वसिष्ठांच्या धर्मशास्त्रांतील उतारे आहेत.

तसेंच विश्वामित्रांच्या विनंतीवरून वसिष्ठांनीं रामाला 'योगवासिष्ठ' नांवाचा वेदांतपर ग्रंथही सांगितला आहे. यांचा 'वास्तुशास्त्रावर' एक ग्रंथ आहे. अशा तऱ्हेनें उत्कृष्ट विद्वत्तासंपन्न, अलौकिक ज्ञानवान आणि लोकोत्तर चारित्र्यवान् प्रभावशाली व्यक्ति वसिष्ठ आहेत हें आपणांला माहीत आहे. त्यांचा राजकारणाशीं काय संबंध असेल तो आपण पाहूंया—रामराज्यांत तो येतो, तो कसा येतो हें विचार करण्यासारखें आहे. धार्मिक रहस्यांचें संशोधन करणाऱ्या आणि निर्विकल्प समाधींत मग्न राहाणाऱ्या त्यांचा राजगादीशीं काय संबंध ? त्यांचा राजसत्तेवर अवर्णनीय ताबा आणि प्रभाव होता याचें कारण काय ? रामायणांत ते मंत्र्यापेक्षांही जास्त वेळां येतात. ते मुख्यमंत्र्यापेक्षांही सर्वप्रथम राजद्वाराच्या कोणत्याही प्रश्नाचे वेळीं उभे असलेले पाहायला मिळतात. ते राजपुरोहित होते म्हणजे काय राजगृहाचीं कर्मकांडाची कामें करीत आणि करवीत असत ? त्यांना काय अधिकार होता ? राजगृह—राजकारण यांच्यांशीं त्यांचा काय संबंध होता ? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे राहातात. वसिष्ठ हे स्वयंप्रकाशित आहेत, निर्विकल्प समाधीत राहाणारे आहेत, त्यांच्याविषयीं पूर्ण विचार करावा लागेल. त्यांना जाणण्यासाठीं सूक्ष्मदृष्टि करून रामराज्याच्या अगोदरचा प्राचीन इतिहास पाहायला हवा; रचनात्मक बुद्धीनें दृष्टिक्षेप हवा.

राजकारण वाचतांना सूक्ष्म दृष्टि व्हायला पाहिजे आणि त्याचा पूर्ण अभ्यास करायला हवा. चातुर्वर्ण्यांत कांहीं कांहीं वेळां वेगवेगळें वर्ण बिघडतात. प्रथम ब्राह्मण वर्ण बिघडला, नंतर क्षत्रियांचे क्षात्रतेज क्षीण होत चालले, कारण एकदां सत्ता व संपत्ति असून जो बिघडणार नाहीं तो 'सहस्राणां कश्चित्.' ज्या काळीं क्षत्रियवर्ग बिघडला होता त्या काळचा विचार करावा लागेल. क्षत्रिय वर्ग बिघडण्याचा कळस झालेला काळ म्हणजे सहस्रार्जुनाचा काळ—त्या काळात उन्मत्तपणाची पराकाष्टा झालेली होती. त्याच्या उन्मत्त आणि सैतानी वृत्तिमुळें लोक त्रस्त झाले होते. सहस्रार्जुनानें अनेक अपराध केले होते. सज्जनांना तो केव्हां हैराण करी हें सांगतांच येत नसे. एकदां परशुरामाच्या वडिलांची गर्दन उडविली होती, त्या दिवसापासून परशुरामाने परशु हातांत घेतला आणि संपूर्ण क्षत्रिय जातीचा संहार केला !

वास्तविक पाहतां क्षत्रिय जातीचा संहार करण्याची गरज नव्हती, तर क्षत्रिय सत्तेच्या नियंत्रणाची गरज होती. क्रोधी झालेल्या परशुरामानें त्याची परवा केली नाहीं—क्रोधामुळें ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली नाहीं. आणि कदाचित् नियतीचीसुद्धां अशीच इच्छा असेल. त्यामुळे अनेक राज्यांत उलथापालथ झाली—समाजशास्त्रांतही नवे प्रयोग शरीराचीही पर्वा न करणाऱ्या, साहसप्रिय, पराक्रमी, उदार आणि मानधन अशा क्षत्रिय जातीची आवश्यकता आहे. कांहीं वेळां त्यांच्यामध्यें भोगलालसा आणि मनस्वीपणा वाढतो, परंतु त्यामुळें त्यांचें निर्मूलन होतां कामा नये. अग्नि मुंबई जाळून टाकील असें असतांना सुद्धां प्रत्येक मनुष्य त्याच्याशीं संबंध ठेवतो. क्षत्रियजातीची सुद्धां त्याचप्रमाणें समाजसंस्थेला गरज आहे, थोडा त्रास घेऊनहि त्यांचें नियंत्रण करून त्यांना सन्मार्गाकडे वळविण्याची गरज आहे, असें बुद्धिवान् आणि विचारवंत यांचेंही मत आहे. त्याकाळीं समाजाला असें वाटत होतें. म्हणून या तेजस्वी लोकांचा जर समूळ नाश केला तर समाजाचें धारण कोण करणार ? तेजस्वी जातीचा परशुराम संहार करतो, मग जगाचें काय होणार ? असे विचार करणाऱ्या बुद्धिमान् लोकांमधून एक कश्यप पुढें आला. तो क्रोधी परशुरामाच्या पुढें जाऊन त्याला म्हणतो, " तर्पण करून तुझी प्रतिज्ञा पुरी कर. क्षत्रियसंहार अयोग्य आहे. क्षत्रिय जातीची गरज आहे. वगैरे गोष्टी अप्रत्यक्षपणें परशुरामाला समजावून त्या भीषणकार्यापासून त्याला निवृत्त व्हायला सांगितलें. परशुराम मूर्ख नव्हता. तो समजला. तो सुद्धां ईश्वराची विभूति होता. त्यानें सर्व पृथ्वी कश्यपाच्या हवालीं केली.

वसिष्ठ ही त्यागी, निष्काम, अनासक्त आणि स्वतंत्र प्रज्ञेची व्यक्ति होती. कणाची ओळख किंवा शरम यांचा त्यांच्यावर बिलकूल परिणाम होत नसे. वेदकाळापासून त्यांचा हा प्रभाव पाहायला सांपडतो. ऋग्वेद वाचा म्हणजे वसिष्ठांचा हा प्रभाव ध्यानांत येईल. त्यांनीं राज्यशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. म्हणून त्या भागाचा राज्य-

कारभार आपल्या शिरावर घेतला. कश्यपांप्रमाणें ते तेजस्वी आणि तपस्वी होते. वसिष्ठांचा आश्रम जंगलांत नव्हता. ते झोंपडींत राहाणारे बुवा किंवा साधु नव्हते. त्यांचा आश्रम एक गुरुकुल होतें. त्यामध्यें अनेक प्रकारचीं, अनेक विचारांचीं माणसें येत असत. राज्याचें त्यांनीं गुरुकुल केलें. एक कौटुंबिक ' युनिट ' तयार केलें. त्याच्यांत कायदा नाहीं, शासकाची गरज नाहीं. शासनसंस्थेला योग्य असें कांहीं नव्हतेंच. सर्व ठिकाणीं समंजसपणाची भाषा ऐकायला मिळत असे. मानसिक समानता होती. याला अराज्यवाद, शासनाभाववाद किंवा स्वयंशासित प्रजा म्हणूंया. सुरवातीला आपण ' अराज्यवाद ' घेतला होता. अराज्यवादाचें प्रलोभन वसिष्ठांना वाटलें. त्यांनीं राज्याचें एक कुटुंब बनविलें. कुटुंबांत कायदा नसतो. प्रजा म्हणजे पण कुटुंब, त्यामुळें तेथेंही कायदा नाहीं. रात्रीं आठ वाजतां यायलाच पाहिजे—असा कुटुंबांत कायदा नसतो. मुलगा समजतोच कीं मी जर जाणार नाहीं तर त्रास होईल. आई काळजी करील, वडील वाट पहात बसतील आणि बहीण सुद्धां जेवणार नाहीं, म्हणून मला लौकर गेलें पाहिजे. त्यामुळें कुटुंबांत ' इंडियन पिनल कोड ' नाहीं. अशा तऱ्हेनें वसिष्ठांनीं राजसत्तेचें विसर्जन केलें. परशुरामानें राजसत्तेचें विसर्जन केलें होतें; परंतु दोघांच्या पद्धतींत केवढा भेद !

त्यांच्या राज्याजवळ गाधिपुत्र विश्वमित्रांचें राज्य होतें. तो प्रतापी राजा होता. त्यानें शेजारच्या राज्यांतील अतिशय सुख, अत्यंत सौजन्य, कल्पनातीत प्रेमळपणा वगैरे पाहिला. अशा तऱ्हेचें राष्ट्र पाहून त्याला कुतूहल वाटलें. तें राज्य पहावें असें त्याच्या मनांत आलें. क्षत्रिय आणि वैश्य यांच्या मुलांचें कुतूहल निरपेक्ष किंवा निरर्थक असूं शकत नाहीं. वसिष्ठांचें राज्य पाहून विश्वामित्राला असें विलोभनीय राज्य घेण्याची इच्छा झाली. शिकारीच्या मिषानें त्यानें सुरवात केली व पाऊल टाकलें. वसिष्ठाच्या राज्याचा तो पाहुणा झाला.

पौराणिक गोष्टींत असें वर्णन आहे कीं, वसिष्ठांनीं विश्वामित्राची खाण्यापिण्याची सुंदर व्यवस्था केली होती. विश्वामित्र हें पाहून चकित झाला. त्यानें वसिष्ठांना हे सर्व कोणीं केलें असें विचारलें. अशा तऱ्हेची व्यवस्था कामधेनूची मुलगी नंदिनी हिच्यामुळें होऊं शकली असे वसिष्ठांनीं सांगितलें. विश्वामित्र म्हणतो, " मला नंदिनी द्या. मी तुम्हांला हजार गाई देतों. " वसिष्ठ म्हणतात, " सौदा ( Bargaiu ) करण्याची गोष्टच नाहीं. " म्हणून विश्वामित्र तिला जबरदस्तीनें नेऊं लागला. नंदिनी वसिष्ठांना विचारते, " माझें रक्षण कोण करणार ? " वसिष्ठ म्हणतात, " मी ब्राह्मण आहे. निर्बळ आहें; तुझें रक्षण तूं करूं शकशील असें कर. " परवानगी मिळतांच नंदिनीनें शेपटी आपटून अनेक सैनिक उभे केले आणि तिनें विश्वामित्राच्या सैन्याचा संहार केला. विश्वामित्राला रिकाम्या हातानें परत जावें लागलें. त्यावेळीं तो म्हणाला, " धिग् बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजो बलं बलम् ! "

वाङ्मयांत रूपकाचा आश्रय करून लिहिलें जातें. त्याचा अर्थ लक्षांत घेतला पाहिजे. ती गोष्ट शब्दार्थाप्रमाणेंच समजतां कामा नये. "उषा अहल्यायै जारः" हें सूर्योदयाचें वर्णन आहे. अह म्हणजे दिवस; दिवस नाहींसा करते ती अहल्या. दिवस नाहींसा करते ती रात्र. जारः—जृणाततीति जारः; क्षीण करतो तो. म्हणजे रात्रीला क्षीण करतो तो, अर्थात् अरुणोदय. आम्ही एवढें वाचून 'व्यभिचाराचें वर्णन आहे' असें समजायला लागलों. अशा तऱ्हेनें लक्षणेनें लिहिण्याची पद्धति संस्कृत भाषेंत आहे.

गाय म्हणजे कोण ? गाय वसिष्ठाच्या आश्रमांत होती. गाय म्हणजे जनता. गाई-सारखी जनता म्हणजे सुशील आणि प्रेमळ जनता. ज्या वेळीं दुःखाचा भार सहन होत नाहीं त्यावेळीं पृथ्वी गाईच्या मुखानें ईश्वराला सांगते. दुःख सहन होत नाहीं म्हणजे जनता सुद्धां हजार मुखांनीं ईश्वराला सांगते. "परित्राणाय साधूना विनाशायच दुष्कृताम्। असें म्हणणाऱ्या ईश्वरा ! तुझी प्रतिज्ञा कुठें गेली ?" आपण व्यवहारांत असें म्हणतों कीं, 'स्त्री ही गरीब गाय आहे.' अशी गाय बोंब मारते हें जनतेवरील रूपक आहे.

गाय म्हणजे जनता. कामधेनु म्हणजे स्वयंशासित प्रजा. कामधेनुचा दुसरा अर्थ भूमि. हा अर्थ पुराणांत अनेक वेळां येतो. धेनूची—जमिनीची—जितकी जास्त सेवा तितकें जास्त फळ—'राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेताम्!' प्राचीन काळापासून भूमीवर गाईचें रूपक करण्यांत आलें आहे. गाय म्हणजे जमीन. याचे अनेक दाखले देतां येतील. कालिदास वगैरे अनेक कवींनींही या उपमेचा वापर केलेला आहे.

भागवताच्या चौथ्या स्कंधांत उन्मत्त आणि दुष्ट वेनराचा मुलगा अतिशय धार्मिक होता. त्यानें गाईची उपासना करण्याची—तिचें संरक्षण करण्याची—प्रतिज्ञा केली. गाय म्हणजे भूमि, भूमि म्हणजे गाय. तो भूमीची सतत उपासना करूं लागला. तो घरोघरीं दुःख पाहाण्यासाठीं फिरतो, त्यावेळीं त्याला ऐकायला येतें कीं, 'धान्य द्या, खायला धान्य द्या, जमीन पीक देत नाहीं, आम्ही काय करूं ?' पृथूनें समाजाची ही दुर्दशा पाहून धनुष्य हातांत घेतलें व गाईच्या पाठीमागें धांवला. गाय पुढें आणि राजा मागें. गाईला वाचा आली. ती म्हणते, "मला मारूं नकोस, मी तुझी मुलगी आहें, तूं माझें संरक्षण कर. अधार्मिक राजामुळें सर्व नष्ट झालें होतें. सडांत दुध आहे, त्यांना तोंड लावून जो ओढील त्याला मी देईन." पृथूनें सडांतून दूध ओढून घेतलें. आंचळ ओढील त्याला दूध मिळेल. पृथूची मुलगी 'ही पृथ्वी' हें रूपक आहे.

# सत्तेचाळीसावा पुण्यतिथ्योत्सव

श्रीसाईबाबा यांचा ४७ वा पुण्यतिथीउत्सव सालाबादप्रमाणें यंदा झाला उत्सवास मुंबई पुणें हैद्राबाद मद्रास, म्हैसूर, आंध्र, मध्यप्रदेश, खानदेश, वऱ्हाड, नागपूर अहमदाबाद ( गुजराथ ) वगैरे प्रांतातून बरेच साईभक्त आले होते.

उत्सवास आरंभ मिती आश्वीन शु. ९ सोमवार दिनांक ४-१०-६५ रोजीं होऊन मिती आश्वीन शु. १२ गुरुवार दिनांक ७-१०-६५ रोजीं गोपालकाला कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. सोमवार रोजीं पहाटे ६ वाजतां नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटोची व पोथीची मिरवणुक मंदिरांतून निघून गुरुपादुकावरून श्रींचे द्वारकामाईंत गेली. तेथें भव्यचांदिचे सिंव्हासनात श्रीची फोटोची स्थापना व २४ तास साईसच्चरित्र अध्यायवाचनास सुरुवात झाली. दुपारी ४ ते ६ वाजेंपर्यंत श्रीमंदिरात श्री. द. दा. उर्फ नानासाहेब रासने पुणें यांचे साईचरित्रावर कीर्तन झाले. रात्रौ ८ ते १० पर्यंत प्रो एस. एस. कालेंकर सातारा यांचे जादु प्रयोग झाले.

मंगळवार दिनांक ५-१०-३५ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त पहाटे श्रींचे फोटोची व पोथींची मिरवणुक द्वारकामाईंतून गुरुपादुकावरून मंदिरात त्यानंतर श्रींचे पंचामृत मंगलस्नान वस्त्रार्पण पुष्पर्पण भक्तांचे सामुदायिक अभिषेक पुजन त्यानंतर १०॥ ते १२ पर्यंत श्री. विठ्ठलराव मराठे सं. गवई यांचे साईपुण्यतिथी आख्यानावर कीर्तन, माध्यान आरती तीर्थ प्रसाद त्यानंतर आराधनाविधी श्री. नागेशराव सावंत मुंबई यांचे हस्ते झाले. सायंकाळीं ५ ते ६ पर्यंत सिमोल्लंघन मिरवणूक शमीपूजन श्री. मा. ग. पोतनीस सन्माननीय कोर्ट रिसीव्हर यांचे हस्ते झाले. रात्रौ ९ ते ११ पर्यंत श्रींचे भव्यरथाची गांवांतून मिरवणूक झाली. व भिक्षेची मिरवणूक सकाळीं ९ ते १० पर्यंत गांवांतून झाली. रात्रभर कलाकारांची हजेरी पहाटे ६ पर्यंत बुधवार दिनांक ६-१०-६५ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने पुणें यांचे एकादशी निमित कीर्तन व रात्रौ श्रींचे पालखीची गावांतून मिरवणूक गुरुवार ता. --१०-६५ रोजीं नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त १०॥ ते १२ श्री. विठ्ठलराव मराठे सं. गवई यांचे कीर्तन गोपाळकाला दहीहंडी होऊन उत्सव समाप्त झाल्याचें जाहीर करण्यांत आले.

उत्सवाकरितां मुद्दाम मांडव ध्वजपताका कमानी घालणेत आल्या व पोलिस बंदोबस्तही ठेवणेत आला. स्वच्छतेसाठीं सर्व खोल्या धुवून डि. डी. टी नें साफ करण्यांत आल्या व पिण्याचे पाण्याचीही व्यवस्था उत्तम ठेवणेत आली होती. सर्व नोकर सेवेकरी यांना संस्थानतर्फे चहा फराळ देण्यांत आला. तसेच सर्व नोकराना उत्सवानिमित्त एक दिवस पक्वान्नाचे जेवण देण्यात आले. उत्सवात कलाकारांनीं हजेरी दिली. त्यात पुष्कळ कलाकारांनीं भाग घेतला व मुंबई ब्यांड वादनपार्टी यानीही भाग घेतलेला होता. येणें प्रमाणें उत्सव उत्तम रीतीनें पार पडला.




## ( आक्टोबर १९६५ )

चालू महिन्यांत बाहेरगांवांचे साईभक्त पुण्यतिथी उत्सवामुळें बरेच आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें.

### कीर्तन

श्री. द. दा. उर्फ नानासाहेब रासने पुणे. श्री. के. बी. गव्हाणकर डॉक्टरसाहेब कुर्ला मुंबई, श्री. शुभदादेवी बोंद्रे गिरगांव मुंबई. सं. गवई विठ्ठलराव मराठे, यांची कीर्तनें नेहमींप्रमाणें झाली. श्री. ह. भ. प. गोपाळ गोविंद खांडेकर पुणें.

### गायन

श्री. हिराबाई बडोदेकर पुणें. श्री. सरस्वतीबाई राणे, पुणें. श्री. कमलाबाई बडोदेकर, पुणें. श्री. वसंतराव देशपांडे पुणें. श्री. सुरेंद्र र.व गायनाचार्य मुंबई दादर. श्री. तुळशीराम बुवा दिक्षीत कुर्ला. श्री. मारुतीबुवा बागडे मुंबई. श्री. खाशाबाबाबुराव कोकाटे मुंबई. सौ. मिराबाई राजगोपाळस्वामी मुंबई.

### सनईवादन

श्री. दामुअण्णा दळवी श्रीरामपूर.

### तबला व मृदंगवादन

श्री. वसंतराव व्होर्णेकर पुणें. श्री. दत्तोबा गुरव शिर्डी. श्री. गुरुदत्त साकोरी. श्री. बाबूराव रामचंद्र सांठम मुंबई. कुमार बबन बाबूराव शेळके कुर्ला.

### संगीत भजन

श्री. डाली जमशेटजी मुंबई. यशवंत मुजुमदार मुंबई. श्री. श्रीपतराव पाटील बीड.

### दिपवाळी

श्रीमहालक्ष्मी सरस्वती पूजन. मे. माननीय कोर्टरिसीव्हर मा. ग. पोतनीस साहेब यांचे शुभहस्ते ता. २४-१०-६५ रविवारीं थाटात झाले. दिपवाळी निमित्त दिपोत्सव शोभेची दारू फटाकडे वगैरेहि झाले.

मोठ्यांच्या भेटी.

मे. एन्. मेहरा. डी. आय. जी. पो. डी. मुंबई.

मे. नेहरूकर, लेबरकमिशनर म. रा. मुंबई.

मे. जी. बी. हुप्रीकर असि. चारिटीकमिशनर पुणें.

मे. डी. डी. साठे. आय. सी. एस्. डे. से. ले. खाते भारतसरकार

मे. महाजन साहेब विभागीय कमिशनर पुणें.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई नाहीं.

## भूषण संसारा

भूषण संसारा ऽ
साई तू योगेश्वरा ॥ धृ ॥
उद्धरिली ही धरा।
घेऊनि अवतारा ॥ १ ॥

जनमानस मंदिरांत।
असशी तू दशदिशात।
भयव्याकुल या तमात।
झडकरि मज तारा ॥ २ ॥

लंघुन हे भवतिमीर।
होईल तव भक्त पार।
झाले रे मन अधीर।
तुजसाठी यदुवीरा ॥ ३ ॥

—बा. भा. मगदूम

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**- by Pradhan | | | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २–५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** by R. S. Harshid Mehta | | | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
**साईनिकेतन**, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: वी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.